PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. १/२०१४

क्र.राप/आस्था/ जीएडी/. ०९
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४०० ००८.
दिनांक : ०९ जानेवारी, २०१४.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई /पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/
  अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/
  उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

विषय: सन २०१३ मध्ये कर्मचारीवर्ग खात्याकडून प्रसारित करण्यात आलेल्या परिपत्रकांबाबत.

---

कर्मचारीवर्ग खात्याकडून दरवर्षी वेगवेगळ्या विषयांवर परिपत्रके प्रसारित करण्यात येतात. सदर परिपत्रके सर्व विभाग /घटक कार्यालयात एकत्रित असणे व दैनंदिन कामकाजाच्या वेळी सर्व स्तरावर उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

सन २०१३ मध्ये कर्मचारीवर्ग खाते, मध्यवर्ती कार्यालयाकडून प्रसारित केलेल्या कांही महत्वाच्या परिपत्रकांची यादी यासोबत माहितीसाठी पाठविण्यात आली आहे. मध्यवर्ती कार्यालयाने प्रसृत केलेली सर्व परिपत्रके आपल्या दप्तरी असल्याची खातरजमा करुन घ्यावी. एखादे परिपत्रक उपलब्ध नसल्यास प्रथम प्रादेशिक कार्यालयाकडून अथवा जवळच्या विभागीय कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यात यावे.

महाव्यवस्थापक ( क. व औ.सं. )

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /
महाव्यवस्थापक ( भा.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन)/
महाव्यवस्थापक (यं. अ.)/ उपमहाव्यवस्थापक (संगणित्र) /उपमहाव्यवस्थापक (विधि)/
मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /
जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक /
मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव /
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव / मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी.
कर्मचारीवर्ग अधिकारी /सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ नियोजन/ समन्वय)/
(प्रशासन/सा.प्रशासन)/ (मुख्यालय)/(घटकसंवर्ग)/(राज्यसंवर्ग)/(भागासवर्ग).

PDF Compressor Free Version

## सन २०१३ मध्ये मध्यवर्ती कार्यालय, कर्मचारीवर्ग खात्याकडून प्रसारीत केलेल्या परिपत्रकांची सूची.

| कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक | विषय | जावक क्रमांक व दिनांक |
|---|---|---|
| १ | सन २०१३ मध्ये प्रसारित केलेली परिपत्रके | क्रमांक राप/आस्था/ जीएडी/०१ दिनांक ०१.०१.२०१३. |
| २ | महामंडळाच्या कर्मचा-यांना एस.टी.बस मधून प्रवास करण्यासाठी मिळणारा मोफत पास बाबत | क्रमांक राप/कर्मवर्ग/प्रशा/फ्री पास/१९३० दिनांक ०६.०५.२०१३. |
| ३ | वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रयोजनार्थ अवलंबित्व ठरविण्यांसाठी उत्पन्नावरील मर्यादा सुधारणेबाबत. | क्रमांक राप/कर्मवर्ग/प्रशा/वै. /२०९३ दिनांक १६.०५.२०१३. |
| ४ | रा.प.कर्मचा-यांना रुग्णालयीन खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत (अश्विनी ॲक्सीडंट मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल,नाशिक या रुग्णालयास कर्करोग चिकित्सा यासाठी मान्यता) | क्रमांक राप/कर्मवर्ग/प्रशा/रुमा/२१२९ दिनांक १८.०५.२०१३. |
| ५ | मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचा-यांबाबत जात वैद्यता प्रमाणपत्र सादर करण्यांसाठी व जात प्रमाणपत्र अवैद्य ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दतीबाबत, | क्रमांक राप/कर्मवर्ग/मावक/२५४५, दिनांक १४.०६.२०१३. |
| ६ | रा.प.कर्मचारी विशेषत: चालक पदातील कर्मचा-यांचे साठी समुपदेशक नेमणेबाबत (मानधनात वाढ व अनुभव कमी केला) | क्र. राप/कर्मवर्ग/प्रशा/समुपदेशक/२७७३ दिनांक २४.०६.२०१३. |
| ७ | अपंग व्यक्तीसाठी आरक्षण ठेवण्यांबाबत व आरक्षणानुसार पदे भरण्यांबाबत कार्यपध्दती निर्गमित करण्यांत आलेले शासन परिपत्रक क्र.अपंग-१००३/ प्र.क्र.१२७ /२००३ /१६-अ, दि.६.५.२००४ मधील सूचना क्र.६ अधिक्रमीत करण्यांबाबत. | क्रमांक राप/कर्मवर्ग/३३६० दिनांक ३१.०७.२०१३. |
| ८ | मागासवगीय प्रवर्गातील कर्मचा-यांबाबत जात-वैधता-प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैद्य ठरलयास पुढील कार्यवाहीबाबत अनुसरावायाची कार्यपध्दती बाबत | क्रमांक राप/कर्मवर्ग/मावक/३४१८, दिनांक ०३.०८.२०१३. |
| ९ | लैंगिक सतावणूकीस प्रतिबंध करण्यांच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत.(कामगार करार परिपत्रक क्र.९) | क.राप/आस्था/लैछ/३८६९, दि.३०.०८.२०१३ |
| १० | प्रसारीत झालेले नाही. | - |
| ११ | कामाच्या ठिकाणी महिलांवर होणा-या लैंगिक अत्याचाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यांबाबत. | क.राप/कर्मवर्ग/प्रशा/लैछ/४११९, दि.१६.०९.२०१३ |
| १२ | मेस्को कडून तसेच जिल्हा सुरक्षा मंडळ कंत्राटी पध्दतीने सुरक्षारक्षक उपलब्ध करुन घेण्यांबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/मनुष्यबळ/४८८३, दि.२५.११.२०१३ |
| १३ | पदोन्नतीचे प्रस्ताव सादर करणे बाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/मावक/५४६१, दि.२७.११.२०१३ |
| १४ | कामगार करार सन २०१२-२०१६ मधील मागणी क्र.७५ मधील तरतुदीबाबत. | क्र.राप/आस्था/७०२-जीई/५७२७, दि.१३.१२.२०१३ |
| १५ | शासकीय अनुदानित वसतीगृहामध्ये अपंगाच्या ३ टक्के जागा पूर्णपणे भरणे व अपंगाच्या सर्व सोयी सुविधा पुरविणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/मावक/५८८७, दि.२३.१२.२०१३ |

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. 2 /२०१४

क्र. राप/कर्मवर्ग/प्रशा/ 323
म.रा.मा.प. महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८.
दिनांकः १८ जानेवारी, २०१४.

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर.

विषय : चालकांची आरोग्य तपासणी करणेबाबत.

------

रा.प.बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सुरक्षित होण्याच्या दृष्टीने चालकाची फार महत्त्वाची भूमिका असते. तेव्हा रा.प.चालक शारीरिकदृष्ट्या चालकाची कामगिरी करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे, त्यामुळे चालकाची शारीरिक क्षमता तपासणी अपरिहार्य ठरते. चालकांची त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या तारखेपासून त्यांचे वय ४० वर्षांचे होईपर्यंत प्रत्येक २ वर्षांचा कालावधी संपल्यानंतर डोळयांची तपासणी तसेच ४० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या निवृत्तीच्या वयापर्यंत म्हणजेच त्यांच्या वयाच्या ५८ वर्षापर्यंत दरवर्षी दृष्टीतीक्षणता तपासणी करणेबाबत सूचना आहेत. सदर सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी. त्याचबरोबर रा.प.महामंडळातील चालकांची संपूर्ण वैद्यकीय तपासणी करुन घेणेबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. आगारातील सर्व चालकांची मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत शारिरीक क्षमतेसंबंधी संपूर्ण वैद्यकीय तपासणी त्वरीत करुन घ्यावी. या तपासणीमध्ये प्रामुख्याने प्राथमिक वैद्यकीय तपासणी, मधुमेह, रक्तदाब याबाबत विशेष तपासणी करावी.
२. मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांना आवश्यक वाटल्यास त्या चालकांना विशेष तपासणीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे पाठवून तपासणी करावी.
३. विभागातील एकही चालक तपासणीविना राहणार नाही याची खात्री करावी.
४. सर्व आगारामध्ये मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांचेकरिता स्वतंत्र कक्ष उपलब्ध करुन द्यावा.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

प्रतः माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नियोजन)/ उपमहाव्यवस्थापक (संगणित्र)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी/उप महाव्यवस्थापक (विधी)/सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिक / जनसंपर्क अधिकारी / कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (घटक संवर्ग) / (प्रशासन) / सामान्यप्रशासन)/ (सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) / (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)

महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३ /२०१४.
कामगार करार २०१२-१६

जा.क्र.राप/कर्मवर्ग/ प.क्र. ८४३
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक १५ फेब्रुवारी, २०१४.

- महाव्यवस्थापक (आंदोलन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई/ पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक/ अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/ धुळे/
  अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/
  उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

विषय :- कामगार करार २०१२-१६ खंड ७८-
कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी खात्यामार्फत पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्याबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे कामगार करार परिपत्रक क्र.०९/२०१३ दि.४ जुलै २०१३.

*****

कामगार करार २०१२-१६ खंड ७८ मधील समझोत्यानुसार कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी खात्या पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्याबाबत तरतूद आहे.

त्यानुसार उपरोक्त संदर्भित परिपत्रकातील अनु.क्र.५ (ड) मध्ये दिनांक १.४.२०१२ पासून व तद्नंतर व वेतनश्रेणीतील कालावधी खात्यामार्फत पदोन्नती देताना ग्राह्य धरण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र काही विभागांकडून याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सदर बाबीमध्ये स्पष्टता आणण्यासाठी खालील प्रमाणे सूचना प्रसारीत करण्यात येत आहेत.

कनिष्ठ/ एकत्रित वेतनश्रेणीवरील जे कर्मचारी दिनांक ३१.३.२०१२ रोजी किंवा तद्नंतर कनिष्ठ/एकत्रित वेतन पदामध्ये ३ वर्षे पूर्ण करुन दिनांक १.४.२०१२ रोजी किंवा त्यानंतर नियमित वेतनश्रेणीवर येतील त्यांचा कनिष्ठ / एकत्रित पदातील सेवा कालावधी हा आपल्या विभाग / घटकात खात्यांतर्गत बढतीसाठी सध्या सुरु असलेल्या कार्यवाहीच्या वेळी तसेच यापुढे खात्यांतर्गत बढतीसाठी होणाऱ्या कार्यवाहीवेळी पदोन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी विहित अटी व तरतुदी अधीन ग्राह्य धरण्यात यावा.

सदर परिपत्रक सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

परिपत्रकाची पोच द्यावी.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत :
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/
महाव्यवस्थापक (भांडार)/महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक (यं.अ.)/
उप महाव्यवस्थापक (नियोजन)/उप महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)/उपमहाव्यवस्थापक (संगणक)/
उप महाव्यवस्थापक (विधि) /मुख्य स्थापत्य अभियंता/मुख्य कामगार अधिकारी/
सचिव, म.रा.मा.प.महामंडळ/जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक/
मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक/
मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव/
मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव/
मुख्य कार्यालयीन अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/
कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(नस्तुव्यवहार नियोजन/समन्वय) ( मागासवर्ग कक्ष)
कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/(आ.प्रशासन/प्रशासन)/(मुख्यालय).
सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी राज्यसंवर्ग/मागासवर्ग कक्ष/घटकसंवर्ग / (प्रशासन/आ.प्रशासन)/मुख्यालय.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ५/२०१४.

जा.क्र.राप/कर्मवर्ग/ प.क्र. / ९८५८
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक : २० फेब्रुवारी, २०१४.

- मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी,
  रा.प.मध्यवर्ती कार्यालय,
  मुंबई-८.
- प्रादेशिक व्यवस्थापक,
  रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.नागपूर विभाग,
  नागपूर

विषय :- पदाच्या आढाव्यानुसार राखण व पहारा निरीक्षक पदाची मध्यवर्ती कार्यालय व नागपूर विभागाची सुधारीत मंजूरी ठरविणेबाबत.

संदर्भ :- कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.८/२००५.
क्र.राप/आस्था/एमपीपी/१३१३ दिनांक ३०.३.२००५.

उपरोक्त संदर्भित परिपत्रकानुसार राज्य संवर्गातील सर्व प्रदेशातील विभागांची पदनिहाय नविन मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर परिपत्रकान्वये नागपूर विभागासाठी राखण व पहारा निरीक्षक पदाची २ मंजूरी कळविण्यात आली आहे. आता नागपूर विभागातील राखण व पहारा निरीक्षक पदाच्या २ मंजूरीपैकी एक मंजूरी कमी करुन ती मध्यवर्ती कार्यालयातील सुरक्षा खात्याकरीता वर्ग करण्यात येत आहे. तरी राखण व पहारा निरीक्षक पदाची सुधारीत मंजूरी खालीलप्रमाणे राहील.

| विभाग/ घटक | पदाचे नाव | परिपत्रक ८/२००५ नुसार कळविलेली मंजूरी | सुधारीत मंजूरी |
|---|---|---|---|
| मध्यवर्ती कार्यालय | राखण व पहारा निरीक्षक | निरंक | ०१ |
| नागपूर विभाग | राखण व पहारा निरीक्षक | ०२ | ०१ |

महाव्यवस्थापक (क.व औ.

प्रत : माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/
महाव्यवस्थापक (यांत्रिकी)/महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक (यं.अ.)/
उप महाव्यवस्थापक (नियोजन)/उप महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)/उपमहाव्यवस्थापक (संगणित्र)/
उप महाव्यवस्थापक (विधि) /मुख्य स्थापत्य अभियंता/मुख्य कामगार अधिकारी/
सचिव, म.रा.मा.प.महामंडळ/जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक/
मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/
मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव/
मा.आयुक्त व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव/
मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/
कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय) (मागासवर्ग कक्ष)
कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/(सा.प्रशासन/प्रशासन)/(मुख्यालय).
सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) यांस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय) यांस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

महाव्यवस्थापक (क.व औ. सं.)

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ५ /२०१४

क्रमांक : राप/आस्था/२०१-ई/ २१३९
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ४०००0८.
दिनांक : ~~२~~ ०३ मे, २०१४.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई /पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/ पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली

**विषयः- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अधिकारी व कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन**

******

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २२/२००६, दिनांक २५ ऑगस्ट २००६ रोजी बदली संदर्भातील सुचना स्वतंत्ररित्या प्रसारीत करण्यात येईल, असे कळविण्यात आले होते. त्यानुसार दि.६.२.२०१४ रोजी रा.प.महामंडळाच्या बैठकीमध्ये वरील विषय संदर्भात प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास महामंडळा मार्फत ठराव क्र.२०१४:२:१५ दि.०६.०२.२०१४ नुसार मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अधिकारी व कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमनाची प्रत आपल्या माहितीकरीता व अंमलबजावणीकरीता पाठविण्यात येत आहे. सदर विनियमन सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणावे व त्यातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

(स्वाक्षरी)

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
म.रा.मा.प.महामंडळ

**सोबतः वरीलप्रमाणे**

प्रत माहितीसाठी सादर रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)/ महाव्यवस्थापक (भां.व ख) / महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (यं.अ) /उपमहाव्यवस्थापक (नियोजन) / उप महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान ) / उप महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग) /उपमहाव्यवस्थापक (विधी)/ मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिक /मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेमं)/ मा.अध्यक्ष, यांचे वैयक्तीक सचिव /उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तीक सचिव / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी /मुख्यालय)/सहा.कर्मचारीवर्गअधिकारी(राज्यसंवर्ग)

(स्वाक्षरी)

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक करिता
म.रा.मा.प.महामंडळ

PDF Compressor Free Version

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अधिकारी व कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन

१) संक्षिप्त नाव - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अधिकारी व कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन

२) व्याप्ती- सदर विनियमन रा.प.सेवेतील सर्व अधिकारी व कर्मचा-यांना लागु राहील.

परंतू एकाकी संवर्गातील बदलीयोग्य नसलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना सदर धोरण लागु होणार नाही.

३) रा.प.सेवाविनियम ४९ नुसार अधिकारी व कर्मचा-यांच्या बदल्यांच्या प्रयोजनार्थ रा.प.कर्मचारी सेवा विनियमनानुसार विहित केलेले सक्षम प्राधिकारी खालील प्रमाणे राहतील.

| अ. क्र. | बदलीपात्र कर्मचारीवर्ग | बदली करण्याकरीता विहित केलेले सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | प्रथमवर्ग अधिकारी व द्वितीय वर्ग (वरिष्ठ) अधिकारी | उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक |
| २ | प्रदेशाच्या अधिकार क्षेत्राखाली येणा-या कार्यालयांव्यतिरिक्त कार्यालयामधील द्वितीयवर्ग (कनिष्ठ ) अधिकारी | महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) |
| ३ | प्रदेशांतर्गत द्वितीय वर्ग (कनिष्ठ ) अधिकारी | प्रादेशिक व्यवस्थापक |
| ४ | अ) मध्यवर्ती घटक कार्यालयातील राज्यसंवर्गीय तृतीयवर्ग कर्मचारी . | महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) |
| | ब) प्रादेशिक कार्यालयातील राज्यसंवर्गीय तृतीयवर्ग कर्मचारी . (संबंधित प्रदेशांतर्गत) | प्रादेशिक व्यवस्थापक |
| ५ | राज्यसंवर्ग, घटक संवर्ग तृतीय व चतुर्थ कर्मचारीवर्ग. (संबंधित घटकांतर्गत) | कार्यालय/ घटक प्रमुख |
| ६ | मध्यवर्ती घटक कार्यालयातील विभागीय पातळीवरील पदांच्या प्रकरणी स्वतःच्या विनंतीवरुन. | महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) |
| ७ | प्रादेशिक कार्यालय व त्याखालील विभागीय कार्यालय येथील विभागीय पातळीवरील पदांच्या प्रकरणी स्वतःच्या विनंतीवरुन | प्रादेशिक व्यवस्थापक |
| ८ | आंतर-प्रादेशिक किंवा प्रदेशांतर्गत राज्यसंवर्ग व घटक संवर्ग कर्मचा-यांच्या बदल्या | महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) |
| ९ | कार्यालयांतर्गत बदली | संबधित कार्यालय / घटक प्रमुख |

४) प्रशासनिक विभाग म्हणजे ज्या प्रशासनिक विभागातून अन्य प्रशासनिक विभागात बदली करता येईल ते. उदा. मध्यवती कार्यालय, प्रादेशिक कार्यालय, मध्यवर्ती कार्यशाळा, मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था व विभागीय कार्यालय व उपरोक्त कार्यालयांतर्गत येणारे खाते/शाखा व अन्य उपशाखा/उपघटक किंवा आगार होय. या प्रयोजनासाठी मध्यवर्ती कार्यालयातील खाती ही स्वतंत्र कार्यालये समजण्यात येतील.

---२/---

PDF Compressor Free Version



५) रा.प.कर्मचारी - यामध्ये खालील अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश होईल.

१) अधिकारी वर्ग -१
२) अधिकारी वर्ग -२ वरिष्ठ
३) अधिकारी वर्ग -२ कनिष्ठ
४) कर्मचारी- (तृतीय श्रेणी) राज्यसंवर्ग
५) कर्मचारी- (तृतीय श्रेणी) घटकसंवर्ग
६) कर्मचारी- (चतुर्थ श्रेणी) घटकसंवर्ग

(यामध्ये कनिष्ठ वेतनश्रेणीवर काम करणा-या कर्मचा-यांचा सुध्दा समावेश आहे.)

६) पद- याचा अर्थ रा.प.कर्मचा-यास नेमून देण्यात आलेले किंवा त्याची पदस्थापना केलेले काम किंवा कर्तव्यपद असा आहे.

७) बदली- याचा अर्थ रा.प.कर्मचा-याची एका पदावरुन किंवा एका प्रशासनिक विभागातून अन्य पदावर किंवा अन्य प्रशासनिक विभागामध्ये त्याच पदावर किंवा दुस-या पदावर होणारी पदस्थापना असा आहे.

८) प्रशासकीय बदल्याः-

अ) रा.प. सेवेतील अधिकारी वर्ग-१ व अधिकारी वर्ग २ या प्रवर्गाकरीता एखादया पदावर असण्याचा सामान्यपणे कालावधी तीन वर्षाचा असेल व त्यानंतर सर्वसाधारणपणे त्याची बदली मार्च/एप्रिल महिन्यात अन्यत्र करण्यात येईल. याकरीता सक्षम प्राधिकारी प्रत्येक वर्षाच्या मार्च/एप्रिल महिन्यात बदलीस पात्र होतील, अशा अधिका-यांची यादी डिसेंबर महिन्यात तयार करतील. बदली पात्र अधिका-यांकडून तीन ठिकाणांसाठी पसंतीक्रम मागविण्यात येईल. बदली करताना प्रशासकीय सोय विचारात घेवून पसंतीक्रमाचा विचार करण्यात येईल. एखादया ठिकाणाकरीता एकापेक्षा जास्त अधिका-यांकडून पसंतीक्रम प्राप्त झाल्यास, अशा प्रकरणी काय कार्यवाही करावी, याबाबत स्वतंत्र अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल.

ब) वर्ग ३ - राज्य संवर्गातील कर्मचा-यांकरीता एखादया पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षाचा असेल. त्यानंतर त्याची बदली मार्च/एप्रिल महिन्यात अन्यत्र करण्यात येईल याकरीता सक्षम प्राधिकारी मार्च/एप्रिल मध्ये बदलीस पात्र होतील, अशा कर्मचा-यांची यादी डिसेंबर महिन्यात तयार करतील. बदली पात्र कर्मचा-यां-कडून तीन ठिकाणांसाठी पसंतीक्रम मागविण्यात येईल. बदली करताना प्रशासकीय सोय विचारात घेवून पसंतीक्रमाचा विचार करण्यात येईल. एखादया ठिकाणाकरीता एकापेक्षा जास्त कर्मचा-याकडून पसंतीक्रम प्राप्त झाल्यास, अशा प्रकरणी काय कार्यवाही करावी, याबाबत स्वतंत्र अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल.

क) वर्ग ३- घटक संवर्गातील कर्मचा-यांकरीता एका ठिकाणी असण्याचा सामान्य कालावधी सहा वर्षाचा राहील. कर्मचा-यांचा ३ वर्षाचा पदावधी पूर्ण झाल्यावर प्रथम त्यांचा कार्यभार बदलावा व त्यानंतर पुढील ३वर्षाचा पदावधी पूर्ण केल्यावर त्यांची बदली त्याच विभागातील अन्य शाखेत किंवा आगारात मार्च महिन्यात करण्यात येईल.

ड) वर्ग ४- घटक संवर्गातील कर्मचा-यांसाठी सामान्यपणे पदावधी निश्चित केला जाणार नाही. तथापी प्रशासकीय कारणास्तव त्यांची बदली करता येईल.

---३/---

PDF Compressor Free Version



इ) खाली नमुद केलेल्या परिस्थितीत, सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत, वर्षातील कोणत्याही वेळी-

(एक) नव्याने निर्माण झालेल्या पदावर किंवा सेवानिवृत्ती, पदोन्नती, राजीनामा, पदावनती, पुनःस्थापना यामुळे किंवा बदलीच्या परिणामस्वरुप रिक्त झालेल्या पदांवर किंवा रजेवरुन परत आल्याच्या बाबतीत;

(दोन) अपवादात्मक परिस्थितीमुळे किंवा विशेष कारणांमुळे किंवा तक्रार असल्यास तक्रारीची चौकशी करुन बदली करणे आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिका-याची खात्री पटली असेल अशा बाबतीत,तसे लेखी नमुद केल्यानंतर आणि लगतनंतरच्या वरिष्ठ प्राधिका-यांच्या पूर्व मान्यतेने, अशी बदली करण्यात येईल.

ई) विशेष प्रकरणात सक्षम प्रधिका-याला, कारणे लेखी नमुद करुन लगतनंतरच्या बदली करणा-या सक्षम प्रधिका-याची पूर्व परवानगी घेऊन रा.प.अधिकारी/ कर्मचा-याची, याचा पदावधी पूर्ण होण्यापूर्वी बदली करता येईल. मात्र ही अट उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी करावयाच्या बदल्यांना लागू होणार नाही.

९) (१) रा.प. अधिकारी/कर्मचारी यांच्या नेमणुकीचा निर्धारित केलेला पदावधी, खाली विनिर्दिष्ट केलेल्या अपवादात्मक प्रकरणामध्ये वाढवता येईलः-

(क) नेमणुकीच्या ठिकाणी किंवा पदावर पदावधी पूर्ण केल्यानंतर बदली साठी पात्र झालेल्या अधिकारी/कर्मचा-याच्या सेवा निवृत्तीसाठी एक वर्षपेक्षा कमी कालावधी शिल्लक असेल तेंव्हा .

(ख) अधिकारी/कर्मचारी एखादा विशिष्ठ कामासाठी आवश्यक ती तांत्रिक अर्हता किंवा अनुभव धारण करणारा असेल व त्या पदासाठी योग्य असा बदली कर्मचारी तात्काळ उपलब्ध नसेल तेंव्हा;

(ग) प्रशासनास अधिकारी/कर्मचा-याच्या सेवेची आवश्यकता एखादया विशिष्ठ पदावर भासत असेल, तेंव्हा.

(२) एकाच विभागात किंवा कार्यालयातील रा.प. अधिकारी/कर्मचा-यांच्या मोठया प्रमाणात बदल्या होत असल्यास महामंडळाच्या कामावर प्रतिकुल परिणाम होवू शकेल, याची जाणीव ठेवून कोणत्याही कार्यालयातील किंवा विभागातील संवर्गातील बदलीपात्र कर्मचा-यांच्या संख्येच्या २०% पेक्षा अधिक नसतील, इतक्या अधिकारी/कर्मचा-यांची पदावरील कालावधीची जेष्ठता विचारात घेवून, एका वर्षात बदली करण्यात येईल.

(३) अधिकारी/कर्मचा-यांच्या बदल्या करताना सक्षम प्राधिकारी बदलीस पात्र होणा-या कर्मचा-याने यापूर्वी कोणकोणत्या पदावर काम केले याची नोंद घेईल व मागील ३ वर्षापर्यंत काम केलेल्या ठिकाणी परत बदलीवर नेमणुक करणार नाही.

(४) ज्या अधिकारी/कर्मचा-यास सेवानिवृत्तीसाठी १वर्ष बाकी आहे अशा अधिकारी / कर्मचा-याची बदली पदावधी पूर्ण केल्यावर सुध्दा करण्यात येणार नाही.

(५) बदल्या करत असताना सर्व विभागात रिक्त पदांचे प्रमाण समान ठेवण्या येईल

---४/---

PDF Compressor Free Version



१०) <u>विनंती बदल्या:-</u>

१) कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचा विनंती बदलीचा विचार करता येणार नाही. परंतू कनिष्ठ वेतनश्रेणीतील ३ वर्षाची सेवा पूर्ण करुन नियमीत वेतनश्रेणीत आल्यावर त्यांना विनंती बदलीचा अर्ज करता येईल व सक्षम प्राधिकारी तो विचारात घेवू शकतील. कर्मचा-याची विनंतीवरुन बदली बाबतचा प्रस्ताव विचारात घेतांना जर एका विभागामध्ये बदली मागणा-या कर्मचा-यांची संख्या जास्त असेल तर उदा. चालक,वाहक,लिपीक-टंकलेखक व सहाय्यक इत्यादी कर्मचा-याच्या विभागामधील अर्जाच्या दिनांकानुसार जेष्ठताक्रम ठरविण्यात येईल, उदा.जर एखादया कर्मचा-याने "क्ष" विभागासाठी विनंतीवरुन बदली मागीतली असेल, तर प्रथमतः "क्ष" विभागामध्ये विनंतीवरुन बदली मागणा-या कर्मचा-यांच्या पदामध्ये जागा रिक्त आहेत काय, याची पडताळणी केली जाईल. त्यानंतर कर्मचा-यांचा विनंतीवरुन बदली मागणा-या विभागामधील अर्जाच्या दिनांकानुसार जेष्ठता विचारात घेतली जाईल व जेष्ठतम कर्मचा-याचा विचार विनंतीवरुन बदलीसाठी केला जाईल. यासाठी कर्मचारी ज्या विभागात कार्यरत आहे, त्या विभागामधील रिक्त जागाही विचारात घेतल्या जातील. ज्या विभागांमध्ये रिक्त जागांचे प्रमाण जास्त असेल, अशा विभागांऐवजी रिक्त जागांचा विचार करुन कर्मचा-यांची विनंतीवरुन बदलीचा विभागवार क्रम निश्चित केला जाईल.

२) बदलीच्या ठिकाणी रुजु झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांस एक वर्षाचा पदावधी पूर्ण केल्यानंतर विनंती बदलीकरीता सक्षम प्रधिका-याकडे अर्ज सादर करता येईल.

३) जर पती व पत्नी दोघेही किंवा त्यांचेपैकी एक रा.प. सेवेत किंवा इतर सेवेत कार्यरत असतील तर दोघांनाही एका ठिकाणी ठेवण्याचा प्रयत्न शक्यतोवर करण्यात येईल.

४) अपंग,महिला, स्वतः कर्मचारी किंवा त्याचे आई, वडील, मुले यांचा गंभीर आजार किंवा गंभीर स्वरुपाच्या अडचणी याचा सहानुभुतीने विचार करण्यात येईल. मतीमंद व्यक्तींच्या /मुलांच्या पालकानी मतीमंद पाल्यांच्या औषधोपचारासाठी, शिक्षणासाठी विशिष्ट स्थानी बदली मिळण्याची विनंती केल्यास त्याचा सहानुभुतीपूर्वक विचार करण्यात येईल. याकरीता ज्या अधिकारी/कर्मचा-यांनी बदलीची विनंती केली आहे, त्यांचा पाल्य मतीमंद असल्याचे व्यावसायिक वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र सादर केलेले असावे.

५) कर्मचा-याच्या एकूण सेवा कालावधीत जास्तीत जास्त तीन विनंती बदल्या विचारात घेण्यात येतील.

६) वर्ग ३- घटक संवर्गातील कर्मचा-याची बदली एका प्रदेशातून किंवा विभागातून किंवा घटकातून अन्य प्रदेशात किंवा विभागात किंवा घटकात करतांना रिक्त जागेची उपलब्धता विचारात घेण्यात येईल.

११) <u>आपआपसातील विनंती बदल्या:-</u> कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या आपआपसातील बदल्या विचारात घेता येणार नाहीत. कनिष्ठ वेतन श्रेणीमध्ये ३ वर्षाची सेवा पूर्ण करुन नियमीत वेतनश्रेणीत प्रवेश केल्यावर त्यांना आपआपसातील विनंती बदलीचा अर्ज सादर करता येईल.

---५/---

PDF Compressor Free Version



१२) ज्या अधिकारी/कर्मचा-याने महाराष्ट्र शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात ०२ वर्षपेक्षा जास्त काम केले आहे अशा कर्मचा-याची विनंती बदली प्राधान्याने करण्यात येईल.

१३) अधिकारी व कर्मचा-यांच्या आंतर प्रादेशिक/प्रदेशांतर्गत विनंती बदल्या हया वर्षातून एकदाच मार्च/एप्रिल महिन्यात करण्यात येतील. त्याची यादी मात्र डिसेंबर महिन्या मध्ये तयार करण्यात येईल.

१४) जर बदलीमुळे महामंडळाच्या कामावर अनिष्ठ परीणाम होणार असेल, तर अशी बदली करण्यात येणार नाही.

१५) वर नमुद केलेल्या तरतुदीनुसार बदल्या संदर्भातील कार्यवाही सर्व सक्षम प्राधिकारी करतील.

--------------

PDF Compressor Free Version

परिपत्रक :

क्र.राप/ कर्मवर्ग/प्रशा/ ९२८६
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई-४००००८.
दिनांक ९२ मार्च,२०१४.

महाव्यवस्थापक (आवेदन ), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.

प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

कार्यशाळा व्यवस्थापक, (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प.दापोडी,पुणे / औरंगाबाद / नागपूर.
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण),रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, मुंबई / ठाणे/ रत्नागिरी/ रायगड / सिंधुदुर्ग / पालघर/ जळगांव / धुळे / अहमदनगर / नाशिक/ पुणे/ सातारा/ सोलापूर/ कोल्हापूर / सांगली/ औरंगाबाद / बीड / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी/ जालना/ भंडारा / चंद्रपूर/ गडचिरोली /वर्धा/ नागपूर/ अमरावती / अकोला/ बुलढाणा/ यवतमाळ

**विषय : महामंडळातील अधिकारी तसेच वर्ग-३ व ४ प्रवर्गातील कर्मचा-यांच्या विरुध्द प्रलंबित असणा-या अपराध प्रकरणांचा निपटारा करणेबाबत**

----

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, रा.प.महामंडळामध्ये कार्यरत असणा-या अधिकारी/कर्मचा-यांच्या विरुध्द साधारणपणे ३० ते ३२ हजार अपराध प्रकरणे प्रलंबित आहेत.

महामंडळाच्या कर्मचारीवृंदाची संख्या व अपराध प्रकरणांचे प्रमाण पाहता सदरची टक्केवारी ही साधारणत: ३० टक्यांच्या आसपास आहे. सदरचे प्रमाण हे मोठे असून, सदर अपराध प्रकरणांमुळे अधिकारी/ कर्मचा-यांच्या मानसीकतेवर विपरीत परिणाम होत असतो.

न्यायदानाला विलंब होणे म्हणजेच न्याय नाकारल्यासारखे असते, ही बाब विचारात घेता प्रलंबित अपराध प्रकरणांचा त्वरेने निपटारा करणे आवश्यक आहे. यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) दि.१६ मार्च,२०१५ ते ३१ मार्च,२०१५ हा पंधरवडा "अपराध प्रकरण निपटारा पंधरवडा" म्हणून अंमलात आणावयाचा आहे.

२) या कालावधीमध्ये सर्व सक्षम प्राधिका-यांद्वारे त्यांच्याकडे प्रलंबीत असलेल्या अपराध प्रकरणांचा आढावा घ्यावयाचा आहे.

रा.प.महामंडळाद्वारे वेळोवेळी दिलेल्या सूचनांप्रमाणे गैरकृत्यांचे वर्गीकरण "अ" "ब" "क" अशा प्रकारे करण्याबाबत या पूर्वी सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार त्या विचारात घेऊन प्रथम प्राधान्याने "क" वर्गातील अपराध प्रकरणांचा निपटारा करण्यात यावा व त्यानंतर "ब" व "अ" वर्गाच्या प्रलंबित अपराध प्रकरणे निकाली काढण्याबाबत विचार व्हावा.

या पंधरवडयाच्या कालावधीमध्ये रा.प.महामंडळातील किमान १५ ते २०% अपराध प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देखील प्रथम आवेदने निकाली काढण्याबाबत कार्यवाही करावयाची आहे.

अपराध प्रकरणांचा निपटारा करण्याच्या कार्यवाहीवर महाव्यवस्थापक(आवेदन) यांचे पूर्ण नियंत्रण राहील. त्यांच्याद्वारे वर नमूद केलेल्या पंधरा दिवसांमध्ये विभागांमध्ये अपराध व आवेदनांचा निपटारा केला जातो किंवा नाही, याची तपासणी केली जाईल व संबंधीत प्रादेशिक व्यवस्थापक व विभाग नियंत्रक यांना वेळोवेळी याबाबत सूचना देण्यात याव्यात.

PDF Compressor Free Version

महाव्यवस्थापक(आवेदन) यांनी वर नमूद केलेला पंधरा दिवसांचा कालावधी संपल्यानंतर दि.७.४.२०१५ रोजी प्रादेशिक व्यवस्थापक व विभाग नियंत्रक यांच्याद्वारे निकाली काढण्यात आलेल्या अपराध प्रकरणांचा व आवेदन प्रकरणांचा तपशिल संकलीत करुन मध्यवर्ती कार्यालयामध्ये उपस्थित राहून याबाबतची माहिती सक्षम प्राधिकारी यांना अवगत करावी.

सर्व सक्षम प्राधिकारी यांना या पत्राद्वारे सूचना देण्यात येतात की, वर नमूद केलेल्या सूचनांप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाव्यवस्थापक(आवेदन) यांच्याकडे दि.४.४.२०१५ रोजी सादर करावा.

वरील परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**<u>प्रत माहितीसाठी सादर रवाना :-</u>**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/
महाव्यवस्थापक (भा.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (यं.अ.)/
उप महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / उप महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) /
उपमहाव्यवस्थापक (विधी)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य कामगार अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ/ जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापक यांचे स्वीय सचिव / कर्मचारीवर्ग अधिकारी / सहा. कर्मचारीवर्ग अधिकारी(मुख्यालय)/ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

PDF Compressor Free Version

महत्वाचे / तातडीचे :

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ६/२०१४

क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/युआर/ २२८६

म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,

महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई-०८

दिनांक : ११.४.२०१४

* प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक/ अमरावती.
* उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण),मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी-पुणे
* विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

विषय : मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी-पुणे येथील संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर चालक (कनिष्ठ) प्रवर्गातील उमेदवारांची वाहन चालन चाचणी घेण्यात येणार असल्याने कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.५२/८० मध्ये बदल करणेबाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक ५२/८० दिनांक २१.८.१९८०

२) महामंडळ ठराव क्रमांक २०१३:०६:२३ दिनांक २५.६.२०१३.

३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/५०९ दि.२८.१.२०१४

४) महामंडळ ठराव क्रमांक २०१४:०१:०९ दिनांक १.१.२०१४

*****

उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ वरील परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना या परिपत्रकान्वये रद्द करण्यात येत आहेत.

महामंडळ ठराव क्रमांक २०१३:०६:२३ दिनांक २५.६.२०१३ व महामंडळ ठराव क्रमांक २०१४:०१:०९ दिनांक १.१.२०१४ अन्वये संचालक मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/८० मधील परिशिष्ट "ब" मध्ये करावयाच्या बदलांबाबत खालीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात चालक पदातील उमेदवारांसाठी वाहन चालन चाचणी घेण्याकरीता संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथ उभारण्यात आलेला आहे.

सदर प्रकल्पामध्ये फॉरवर्ड "8" ट्रॅक,रिव्हर्स "S" ट्रॅक,रिव्हर्स पार्किंग,अप ग्रेडियन्ट इत्यादी स्वतंत्र संगणकीय ट्रॅकवर चालन चाचणी घेण्यात येणार असल्याने महामंडळाचे वाहन चालक निवडीमध्ये संपूर्णतः पारदर्शकता येऊन सर्व चालकांची समान चाचणी होऊन चांगले कौशल्य असलेल्या चालकांची निवड होऊन प्रवाशी सुरक्षिततेची हमी राहणार आहे. तसेच कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त उमेदवारांची स्पर्धात्मक चाचणी होऊन चाचणी नंतर उमेदवाराचे निकालपत्र संगणकाद्वारे प्राप्त होणार असून त्यामुळे तक्रारीस वाव राहणार नाही. सदर पथ लवकरच चालकांची चाचणी घेण्याच्या कामासाठी योग्य होणार आहे.

रा.प.महामंडळामध्ये चालक (कनिष्ठ) प्रवर्गातील उमेदवारांच्या भरतीच्या अनुषंगाने कार्यपद्धती सुचना कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक ५२/१९८० दिनांक २१ ऑगस्ट १९८० अन्वये प्रसारीत केलेल्या होत्या. सदर परिपत्रकामधील सूचनांप्रमाणे वाहन चालन चाचणी ही महामंडळाद्वारे गठीत केलेल्या विभाग नियंत्रक, उपयंत्र अभियंता, वाहतूक निरीक्षक (प्रशिक्षण) यांचा समावेश असलेल्या समितीद्वारे घेण्यात येते. या समितीचे सर्व सदस्य खालील बाबीवर आधारीत गुण चालकास प्रदान करतात.

| क्र. | तपशील | कमाल गुण |
|---|---|---|
| १) | चालकाची मुक्त चालन पध्दती. | ३० |
| २) | मार्गावरुन गाडी चालविणे. | ३० |
| ३) | गाडी चालविताना द्यावयाचे संकेत.(सिग्नल) | २० |
| ४) | गाडी मागे घेणे / तसेच पार्क करणे. | १० |
| ५) | गाडीची तांत्रिक माहिती चालकांकरिता असलेले वाहतुकीचे संकेत व मानसिकता. | १० |
| | एकूण | १०० |

..२..

PDF Compressor Free Version

संगणकीकृत वाहन चालन पथावर वाहन चालन चाचणी घ्यावयाची झाल्यास उपरोक्त नमुद केल्यानुसार अस्तित्वात असलेली परिपत्रक क्रमांक ५२/८० मधील वाहन चालन चाचणी समितीमार्फत घ्यावयाच्या गुणांच्या तरतुदीत परिशिष्ट "ब" मध्ये आवश्यक ते बदल करण्यास रा.प.संचालक मंडळाने महामंडळ ठराव क्रमांक २०१३:०६:२३ दिनांक २५.६.२०१३ अन्वये मान्यता दिलेली आहे.

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/८० मधील परिशिष्ट "ब" मध्ये बदल करणेबाबत रा.प.संचालक मंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. महामंडळ ठराव क्रमांक २०१४:०१:०१ दिनांक १.१.२०१४ अन्वये संचालक मंडळाने खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.

१) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/८० दिनांक २१.८.१९८० अन्वये चालकांच्या निवडीबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.सदर कार्यपध्दतीमध्ये प्रादेशिक छाननी समितीद्वारे घेण्यात येत असलेल्या वाहन चालन चाचणी व्यतिरिक्त अन्य कोणताही बदल करण्यात येऊ नये.सदर कार्यपध्दतीमध्ये नमुद केल्यानुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची प्राथमिक छाननी विभागीय पातळीवरील समितीमार्फत परिपत्रकांमधील सूचनांनुसार घेण्यात यावी व या चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना संबंधीत विभागांमार्फत मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी-पुणे येथे आवश्यक त्या कागदपत्रांसह उचित कागदपत्र छाननी व संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर वाहन चालन चाचणी घेण्यासाठी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी-पुणे येथे पाठविण्यात यावे.

२) मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी-पुणे येथे या उमेदवारांच्या कागदपत्रांची व शारिरीक पात्रतेची छाननी कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/८० मधील सूचनांप्रमाणे करण्यात यावी व त्यामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची संदर्भित परिपत्रकामधील सूचनांप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या प्रादेशिक छाननी समिती (Regional Screening Committee) ऐवजी संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर वाहन चालन चाचणी घेण्यात येईल व सदरची कार्यपध्दती वाहन चालन चाचणी पथ कार्यान्वित झाल्यांनतर होणा-या चालकांच्या भरतीसाठी लागु राहील.

३) संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर चालक पात्र ठरल्यानंतर सदर चालक उमेदवारांना रा.प.महामंडळाच्या सध्याच्या कार्यपध्दतीनुसार वैद्यकीय तपासणी,४८ दिवसांचे प्रशिक्षण व त्यानंतर यंत्र अभियंता (चालन) व विभागीय वाहतूक अधिकारी यांचेमार्फत अंतिम वाहन चालन चाचणी इत्यादी सध्याच्या कार्यपध्दतीनुसार करावयाची कार्यपध्दती सुरु राहील, त्यात कोणताही बदल करण्यात येऊ नये.

४) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/८० मधील परिशिष्ट "ब" (Annexure "B") मध्ये वाहन चालन चाचणी समितीमार्फत घ्यावयाच्या गुणाच्या तरतुदीत खाली नमुद केल्यानुसार आवश्यक ते बदल करण्यात यावे.

| क्र | चाचणीचा प्रकार | वेळ (सेकंदात) | गुण | उत्तीर्ण होण्यासाठी ५० टक्के गुण |
|---|---|---|---|---|
| १ | "8" ट्रॅक ( Forward "8' Test ) | ६० | ५ | २.५ |
| २ | चढावावरील चाचणी. (Up-Gradient Test) | ० | ५ | २.५ |
| ३ | "S" ट्रॅक वर गाडी मागे घेणे.(Reverse "S" Test) | ३०० | ७ | ३.५ |
| ४ | गाडी मागे घेणे व पार्किंग करणे (Reverse Parking Test) | ६० | ६ | ३ |
| ५ | वाहतूक निशाणी चाचणी.(Signal) | १२० | २ | १ |
| | एकूण | ५४० से. | २५ | १२.५ |

PDF Compressor Free Version



i) "8 " ट्रॅक (Forward "8 " Test) :

अ) सदर चाचणी चालकाने १ मिनिटात पुर्ण करणे अपेक्षित आहे.
ब) सदर चाचणीकरीता चालकाने अतिरिक्त ३० सेकंदापर्यंत घेतल्यास १ गुणाची कपात करावी.
क) सदर चाचणीकरीता चालकाने अतिरिक्त १ मिनिटपर्यंत घेतल्यास २ गुणांची कपात करावी.
ड) सदर चाचणीकरीता चालकाने अतिरिक्त १ १/२ पर्यंत मिनिट घेतल्यास ३ गुणाची कपात करावी.
इ)सदर चाचणीकरीता चालकाने अतिरिक्त २ मिनिटापर्यंत घेतल्यास ४ गुणाची कपात करावी.
फ) चाचणीकरीता एकूण ३ मिनिटापेक्षा जास्त वेळ घेतल्यास काहीही गुण देण्यात येऊ नये.
ग) सदर चाचणीच्या वेळी आतील किंवा बाहेरील सेसर्संना स्पर्श केल्यास प्रत्येक स्पर्शाकरीता १ गुणाची कपात करावी.

ii) चढावावरील चाचणी. (Up-Gradient Test): चढावावर एका विशिष्ट ठिकाणी वाहन थांबविल्यानंतर

अ) वाहन पुन्हा पुढे नेताना ४ इंचापर्यंत मागे आल्यास १ गुण कपात करावा.
ब) ४ ते ८ इंचापर्यंत मागे आल्यास २ गुण कपात करावेत.
क) ८ तो १२ इंचापर्यंत मागे आल्यास ३ गुण कपात करावेत.
ड) १२ ते १६ इंचापर्यंत मागे आल्यास ४ गुण कपात करावेत.
इ) १६ इंचापेक्षा जास्त मागे आल्यास काहीही गुण देण्यात येऊ नयेत.

iii) गाडी मागे घेऊन स्थानबध्द करणे (Reverse Parking Test) :

सदर चाचणीकरीता १ मिनिट अवधी देण्यात आला आहे.

अ) सदर चाचणीस एकूण १ १/२ मिनिटांपर्यंत वेळ घेतल्यास १ गुण कपात करावा.
ब) सदर चाचणीस एकूण १ १/२ ते २ मिनिटांपर्यंत वेळ घेतल्यास २ गुण कपात करावेत.
क) सदर चाचणीस एकूण २ ते २ १/२ मिनिटांपर्यंत वेळ घेतल्यास ३ गुण कपात करावेत.
इ) सदर चाचणीस एकूण २ १/२ मिनिटापेक्षा जास्त वेळ घेतल्यास काहीही गुण देण्यात येऊ नयेत.
फ) सदर चाचणीस रस्त्याच्या कडेला असलेल्या सेसर्संना स्पर्श केल्यास प्रत्येक स्पर्शाकरीता १ गुण कपात करावेत.

iv) "s" ट्रॅक वर गाडी मागे घेणे.(Reverse "s" Test)

"s" ट्रॅक वर गाडी मागे घेणे.(Reverse "s" Test) ही वाहन चालन चाचणी ३ मिनीटे म्हणजे १८० सेकंदांऐवजी ५ मिनीटांची म्हणजेच ३०० सेकंदांची असावी व त्याचबरोबर सदर चाचणीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात याव्यात.

अ. सदर चाचणी उमेदवाराने ५ ते ५ $^{1}/_{2}$ मिनीटात पुर्ण केल्यास १ गुण कपात करावा.
ब. सदर चाचणी उमेदवाराने ५ $^{1}/_{2}$ ते ६ मिनीटात पुर्ण केल्यास २ गुण कपात करावेत.
क. सदर चाचणी उमेदवाराने ६ ते ६ $^{1}/_{2}$ मिनीटात पुर्ण केल्यास ३ गुण कपात करावेत.
ड. सदर चाचणी उमेदवाराने ६ $^{1}/_{2}$ ते ७ ते मिनीटात पुर्ण केल्यास ४ गुण कपात करावेत.
इ. सदर चाचणी उमेदवाराने ७ मिनीटापेक्षा जास्त वेळ घेतल्यास काहीही गुण देण्यात येऊ नये.
फ. सदर चाचणीच्या वेळी रस्त्याच्या कडेला असलेल्या सेन्सर्सना स्पर्श झाल्यास प्रत्येक स्पर्शाकरीता १ गुण कपात करण्यात यावा.

v) वाहतुक निशाणी ओळखणे चाचणी. (Identification of Traffic symbols )

सदर चाचणीकरीता चालक उमेदवारास ४ वाहतूक निशाण दाखविण्यात येऊन त्याखाली ८ निशांणाची नांवे दर्शविण्यात यावी व चालकाने ४ निशाणे व नांवे त्यांच्या जोडया अचूक ओळखाव्यात.सदर चाचणीकरीता २ मिनिटे देण्यात येणार आहेत व प्रत्येक बरोबर उत्तराकरीता १/२ गुण देण्यात येईल. २ मिनिटाचे आत दिलेल्या उत्तरांचाच निकालाकरीता विचार होईल.

PDF Compressor Free Version

मुद्दा क्रमांक ४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या तक्त्यामध्ये नमुद केल्यानुसार सदरची वाहन चालन चाचणी ही २५ गुणाची एकदाच घेण्यात यावी व प्रत्येक वाहन चालन चाचणी प्रकारात ५० टक्के गुण उमेदवाराने मिळविणे आवश्यक आहे.वाहन चालन चाचणीमध्ये उत्तीर्ण होणेसाठी वर नमुद केलेप्रमाणे सर्व चाचणी प्रकारामध्ये मिळून १२.५ गुण मिळविणे आवश्यक आहे.

५) उपरोक्त क्रमांक ४ येथे नमुद केल्यानुसार मे.निपुण नेट सोल्युशन्स यांचेमार्फत सिस्टीममध्ये / सॉफ्टवेअरमध्ये आवश्यक ते बदल करण्याची जबाबदारी उप महाव्यवस्थापक (संगणित्र) यांची राहील.

६) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/८० मध्ये नमुद केल्यानुसार परिशिष्ट "ब" वर सही करणारे अधिकारी विभाग नियंत्रक,उप यंत्र अभियंता या दर्जाचे अधिकारी असले तरी यापुढे सुरु करावयाच्या संगणकीकृत वाहन चालन चाचणी नंतरच्या अहवालावर सर्टिफाईंग ऑफिसर म्हणून स्वाक्षरी करण्याकरीता कर्मचारीवर्ग खात्यामार्फत विभागीय वाहतूक अधिकारी किंवा उप यंत्र अभियंता यांची ८ दिवसांकरीता आळीपाळीने (रोटेशन पध्दतीने ) नियुक्ती करण्यात येईल. तसेच, सदर चाचणी दरम्यान सुरक्षा खात्यामार्फत सुरक्षा खात्याचा अधिकारी किंवा पर्यवेक्षकीय दर्जाचा कर्मचारी देण्यात यावा. याबाबत चाचणीसाठी पाठविण्यात आलेल्या विभागामार्फत सुरक्षा व दक्षता खात्याशी समन्वय साधुन कार्यवाही पूर्ण करावी.

७) यापुढे होणा-या नवीन चालक भरतीमधील चालकांची वाहन चालन चाचणी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी-पुणे येथे घेण्यात येणार असल्याने आवश्यक असणारा कर्मचारीवर्ग हा प्रत्येक विभागांनी पॅनल तयार करुन, त्यांना प्रशिक्षण देऊन या पॅनलचा वापर आवश्यकतेनुसार चाचणी दरम्यान करण्यात यावा.विभागातील कर्मचारीवर्गांना उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण),मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी-पुणे यांचेमार्फत आवश्यक वेळापत्रक (Schedule) तयार करण्यात येऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

८) सदर वाहन चालन चाचणीचे काम पुर्णपणे पारदर्शकतेने करण्याची जबाबदारी उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) व वरील अनुक्रमांक ६ नुसार संबंधीत विभागाकरीता नेमण्यात येणा-या सर्टिफाईंग ऑफिसर यांची राहील. तसेच सर्व चाचण्यांचे सी.सी.टिव्हीद्वारे चित्रिकरणांचे व संगणकीय तपशिलांचे जतन करण्याची जबाबदारी उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) यांची राहील.

९) संगणकीकृत वाहन चालन चाचणीपथ (ADTT) काही कारणास्तव बंद पडला असल्यास अथवा अपवादात्मक परिस्थितीमध्ये वाहन चालन चाचणी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी-पुणे येथील संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर न घेता सदर चाचणी विभागात घ्यावयाची झाल्यास अशावेळी परिपत्रक क्रमांक ५२/८० दिनांक २१.८.१९८० मधील प्रचलित कार्यपध्दतीनुसार वाहन चालन चाचणी पध्दत अवलंबिण्यात यावी.

१०) महामंडळातील सध्या कार्यरत असलेल्या चालकांने अपघात केल्यास त्याला भोसरी-पुणे येथे विभागीय स्तरावरील उजळणीनंतर संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर चाचणी देण्याकरीता पाठवावे व त्यात अपात्र झाल्यास परत विभागात पाठवून उजळणी प्रशिक्षण द्यावे व पुन्हा भोसरी-पुणे येथे संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर चाचणी देण्याकरीता पाठवावे. अशाप्रकारे दोन वेळा उजळणी प्रशिक्षण घेतल्यानंतरही संबंधीत चालक संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर दुस-यांदा नापास झाल्यास संबंधीत विभागामार्फत सदर चालकांना उचित प्रशिक्षण देण्यात यावे.

उपरोक्त नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी व सदर कार्यवाही करताना आवश्यकता वाटल्यास संबंधीत प्रादेशिक कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.सदर परिपत्रक मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या मान्यतेनुसार प्रसृत करण्यात येत आहे.

महाव्यवस्थापक (कि.वे.औ.सं.)

प्रत रवाना : माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

- मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी /वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (भांवख)/महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक (यं.अ.)/ महाव्यवस्थापक (नियोजन)/मुख्य विधि अधिकारी /उप महाव्यवस्थापक (संगणित्र)/ मुख्य स्थापत्य अभियंता/मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिक / मा.अध्यक्ष,म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव /मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव यांस माहितीसाठी.

महाव्यवस्थापक (कि.वे.औ.सं.)

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.७ /२०१४

क्र.रापं/ कर्मवर्ग/आस्था/यूआर/२३१३
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-०८. दिनांक :१५.५.२०१४.

- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक/ अमरावती.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण),मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी-पुणे.
- विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.
- कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.

**विषय : वर्ग-३व वर्ग-४ घटकसंवर्गातील सरळसेवा भरती कार्यपध्दतीबाबत.**

****

रा.प.महामंडळातील वर्ग-३ व वर्ग-४ घटकसंवर्ग पदातील सर्व पदांकरीता सरळसेवा भरतीअंतर्गत भरती करताना खालीलप्रमाणे कार्यपध्दती / निवडीचे निकष अंमलात आणण्याबाबत संचालक मंडळाने ठराव क्रमांक २०१४:०२:९१ दिनांक ६.२.२०१४ अन्वये मान्यता दिली आहे.

१) महामंडळ ठराव क्रमांक २०१२:०६:१६ दिनांक २०.६.२०१२ अन्वये सरळसेवा भरती अंतर्गत भरती करताना चालक (कनिष्ठ), वाहक (कनिष्ठ),सहाय्यक (कनिष्ठ) व लिपीक-टंकलेखक (कनिष्ठ) पदातील उमेदवारांच्या निवडीकरिता मुलाखती न घेता निवडीचे निकष ठरवून देण्यात आले आहेत. त्यानुसार चालक पदासाठी लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांवर ४० टक्के भारांक व वाहन चालन चाचणीत मिळालेल्या गुणांवर ६० टक्के भारांक देऊन तोंडी मुलाखत न घेता १०० टक्के एकत्रित भारांकानुसार गुणवत्तेनुसार व इतर पदासाठी लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांना १००% भारांक देऊन सामाजिक समांतर आरक्षणानुसार गुणवत्तेनुसार गरज भासल्यास निवड करण्यात येईल. आता सदर ४ पदे वगळून वर्ग-३ घटकसंवर्ग व वर्ग-४ घटकसंवर्गातील उर्वरित पदांकरीता खालील परिच्छेद क्रमांक २ व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे भरती प्रक्रिया कार्यपध्दती अंमलात आणण्यात यावी.

२) महामंडळ ठराव अन्वये यापुढे वर्ग-३ घटकसंवर्ग व वर्ग-४ घटकसंवर्गातील पदातील एस.एस.सी.उत्तीर्ण किंवा आय.टी.आय.उत्तीर्ण किंवा त्यापेक्षा जास्त अर्हता आवश्यक असलेल्या पदांकरीता ( ज्या पदांना शारिरीक क्षमता चाचणी / व्यवसाय चाचणी विहीत केली आहे आणि ज्या पदांना शारिरीक क्षमता चाचणी / व्यवसाय चाचणी विहीत केली नाही अशा दोन्ही प्रकारच्या पदांसाठी.) भरती प्रक्रिया राबवितांना बाह्य संस्थेमार्फत लेखी परीक्षा घेण्यात यावी . सदर लेखी परीक्षा उत्तीर्ण होणेकरीता सर्व प्रवर्गातील उमेदवारांना किमान ३५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील व पुरेसे मागासवर्गीय उमेदवार न मिळाल्यास मागासप्रवर्गासाठी सदर उत्तीर्ण गुण मर्यादा ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम राहील. ज्या पदांना शारिरीक क्षमता चाचणी / व्यवसाय चाचणी विहीत केली नाही त्यांचे बाबतीत लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या तोंडी मुलाखती न घेता लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांवर १०० टक्के भारांकानुसार गुणवत्तेनुसार निवड करण्यात यावी. ज्या पदांना शारिरीक क्षमता चाचणी / व्यवसाय चाचणी विहीत केली आहे, त्यांचे बाबतीत खालील परिच्छेद ३ मध्ये नमुद केल्यानुसार कार्यवाही करावी.

३) शासन निर्णय दिनांक १९.१०.२००७ नुसार व शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१०११/प्र.क्र.९९/ ११/१३-अ दिनांक २६.१२.२०११ अन्वये यापुढे ज्या घटकसंवर्गातील वर्ग-३ व वर्ग-४ पदातील उमेदवारांना शारिरीक क्षमता चाचणी / व्यवसाय चाचणी विहीत केलेली आहे, अशा पदांकरीता वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे लेखी परीक्षा घेतल्यानंतर सदर लेखी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या व्यवसायनिहाय व सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय गुणवत्तेनुसार १:३ प्रमाणात उमेदवारांना कागदपत्रे तपासणी व शारिरीक क्षमता चाचणी / व्यवसाय चाचणीसाठी विभागांमार्फत बोलाविण्यात यावे. सदर उमेदवारांची १०० गुणांची अर्हताकारी व्यवसाय चाचणी / शारिरीक क्षमता चाचणी घेण्यात यावी. या चाचणीत किमान ३५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील व पुरेसे उमेदवार उपलब्ध होत नसल्यास मागासवर्गीयांकरिता सदर गुण मर्यादा ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम राहील. सदर व्यवसाय चाचणी ही अर्हताकारी असल्याने यात पात्र ठरणाऱ्या उमेदवारांचे सदर व्यवसाय / शारिरीक क्षमता चाचणीचे गुण निवडीकरीता विचारात न घेता, फक्त लेखी परीक्षेतील गुणांवर १०० टक्के भारांकानुसार तोंडी मुलाखत न घेता, सामाजिक,समांतर प्रवर्गनिहाय गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करण्यात यावी.

४) प्रमुख कारागिर (कनिष्ठ), कारागिर "क" (कनिष्ठ) व सहाय्यक (कनिष्ठ) या पदांकरीता आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे. प्रमुख कारागिर (कनिष्ठ), कारागिर "क" (कनिष्ठ) व सहाय्यक (कनिष्ठ) या पदांसाठी

..२..

PDF Compressor Free Version

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील (आय.टी.आय.) संबंधीत व्यवसायातील पाठ्यक्रम (परीक्षा) उत्तीर्ण किंवा संबंधीत व्यवसायातील केंद्रशासनाची अखिल भारतीय व्यवसाय परीक्षा (N.C.T.V.T) उत्तीर्ण किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाची संबंधीत व्यवसायामधील परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

- प्रमुख कारागिर (कनिष्ठ), कारागिर "क" (कनिष्ठ) व सहाय्यक (कनिष्ठ) या पदाकरीता विहीत केलेल्या इतर आवश्यक अर्हतेमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. परंतु सामान्य आस्थापना आदेश क्रमांक ११५६ दिनांक ३.९.१९९१ अन्वये प्रमुख कारागिर व कारागिर "क" या प्रवर्गात लोहार , टायर जोडारी व रबर संयोजक या व्यवसायाकरीता इयत्ता ७ वी पास अशी शैक्षणिक पात्रता विहीत करण्यात आलेली आहे. त्यात बदल करुन इयत्ता ७ वी ऐवजी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा महामंडळाने ११/२००९ या परिपत्रकानुसार सहाय्यक या पदाकरीता विहीत केलेल्या कोणत्याही एका व्यवसायातील कोर्स (आय.टी.आय.) उत्तीर्ण अशी नवीन शैक्षणिक पात्रता विहीत करण्यात येत आहे. औद्योगिक संस्थेचा कोर्स (आय.टी.आय.) हा महामंडळाने कर्मचारीवर्ग परिपत्रक क्रमांक ११/२००९ नुसार जे १३ व्यवसाय (ट्रेड ) निश्चित करुन दिले आहेत, त्या ट्रेड मधीलच आय.टी.आय.उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. किंवा सदर १३ व्यवसायापैकी कोणत्याही एका व्यवसायाची केंद्रशासनाची अखिल भारतीय व्यवसाय परीक्षा (N.C.T.V.T) उत्तीर्ण किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाची संबंधीत व्यवसायामधील परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.
- प्रमुख कारागिर (कनिष्ठ) (लोहार) / (टायर जोडारी ) / (रबर संयोजक ) या पदांसाठी सध्या ७ वर्षाचा अनुभव विहीत केलेला असून त्यात बदल करुन त्याऐवजी ५ वर्षाचा अनुभव विहीत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, कारागिर "क" (कनिष्ठ) (लोहार) / (टायर जोडारी ) / (रबर संयोजक ) या पदांसाठी सध्या ५ वर्षाचा अनुभव विहीत केलेला आहे. त्यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

५) उपरोक्त मुद्दा क्रमांक ३ नुसार निवड केलेल्या उमेदवारांना नेमणूक देण्यापूर्वी सदर उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व संबंधीत दाखल्यांची तपासणी तसेच शारिरीक पात्रता मोजणी संबंधीत विभागाच्या / मध्यवर्ती कार्यशाळेच्या / घटकाच्या प्रमुखांमार्फत १) वाहतूक / प्रशासकिय खात्यामधील पदांकरीता विभागीय वाहतूक अधिकारी / यांत्रिकी पदांकरीता यंत्र अभियंता (चालन) २) संबंधीत विभागीय / सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी व ३) सुरक्षा अधिकारी यांचा समावेश असलेल्या समितीमार्फत करण्यात यावी.

६) सरळसेवा भरती सन २०१२ अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या सहाय्यक (कनिष्ठ) पदाच्या अतिरिक्त यादीवरील उमेदवारांना नियमानुसार नेमणूका देण्यात याव्यात. तसेच, सहाय्यक (कनिष्ठ) पदाची नवीन जाहिरात देऊन कार्यवाही करण्यात येत असली तरी सरळसेवा भरती सन २०१२ अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या सहाय्यक (कनिष्ठ) पदातील अतिरिक्त यादी शासन निर्णय दिनांक २७.६.२००८ नुसार वैध राहील.

७) सरळसेवा भरती सन २०१२ अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या निवडयादीची मुदत व यापुढे वर्ग ३ व वर्ग-४ घटकसंवर्ग पदातील सरळसेवा भरती अंतर्गत जाहीर केलेल्या निवडयादीची मुदत निवडयादीच्या जाहीर दिनांकापासून १ वर्ष इतकी राहील.

८) निवडयादीवरील अतिरिक्त उमेदवारांची संख्या शासन निर्णय क्रमांक प्रानिमं१०११/प्र.क्र.९९/११/१३-अ.दिनांक २६.१२.२०११ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात यावी.

उपरोक्त नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी व सदर कार्यवाही करताना आवश्यकता वाटल्यास संबंधीत प्रादेशिक कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

महाव्यवस्थापक (कर्म.औ.सं.)

प्रत रवाना : माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

- मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी /वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (भांवखं)/महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक (यं.अ.)/ महाव्यवस्थापक /नियोजन/मुख्य विधि अधिकारी /उप महाव्यवस्थापक (संगणित्र)/ मुख्य स्थापत्य अभियंता/मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिक / मा.अध्यक्ष,म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव /मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / सा.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग/ मुनष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

महाव्यवस्थापक (क.औ.सं.)

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ८/२०१४

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/लै.छ/ २४९६
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई-४००००८.
दिनांक: २८ मे, २०१४.

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर./ गडचिरोली

विषय: कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ: १)परिपत्रक क्र.राप/आस्था/लैछ/६७२२ दि.३१.१२.२०१२.
२)कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.११/२०१३ जावक क्र.राप/कर्मवर्ग/लै.छ/ ४११९ दिनांक १६ सप्टेंबर, २०१३.

----------

उपरोक्त संदर्भित क्र.१ नुसार महिला लैंगिक अत्याचार तक्रार निवारण यंत्रणा समिती मध्यवर्ती कार्यालय स्तरावर निर्माण करण्यात आली होती. सदर समितीतील अध्यक्ष व दोन सदस्य यांची बदली अन्यत्र झाल्याने सदर समिती निरसीत करुन नव्याने खालील प्रमाणे तक्रार निवारण यंत्रणा समिती पुनर्गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | श्रीमती व्ही.व्ही.गाडगीळ | उपा.व व्यव.संचालक यांचे स्वीय सहाय्यक,मध्य.कार्यालय |
| २ | सदस्य सचिव | श्रीमती एम.पी.वानखेडे | विभागीय वाहतूक अधिक्षक,मध्यवर्ती कार्यालय |
| ३ | सदस्य | श्रीमती शिल्पा मल्होत्रा | सहा.लेखा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय |
| ४ | सदस्य | श्री.व्ही.एन.शेटे | मुख्य कामगार अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय |
| ५ | सदस्य | श्री.एन.आर.तिवारी | यंत्र अभियंता (चालन) मध्यवर्ती कार्यालय |
| ६ | सदस्य | श्री.इ.एस.भगदूम | सांख्यिक,मध्यवर्ती कार्यालय |
| ७ | सदस्य | श्रीमती दिव्या तनेजा | अशासकीय सदस्य (टाटा सामाजिक विज्ञान संस्थान, मुंबई) |

यापुढे विभागीय / प्रादेशिक कार्यालयातील किंवा मध्यवर्ती कार्यशाळेतील वर्ग-१ किंवा २ सेवेतील अधिकाऱ्यांविरुध्द उदभवलेल्या तक्रारी ह्या संबंधित प्रादेशिक कार्यालयातील महिला लैंगिक अत्याचार तक्रार निवारण समितीकडे पाठविण्यात येतील.

परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ उपमहाव्यवस्थापक (नियोजन)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) /मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी /सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिक / जनसंपर्क अधिकारी / कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय)/ (मनुष्यबळ) / (घटकसंवर्ग) / (प्रशासन) / सामान्य प्रशासन)

महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ९ /२०१४

क्र.राप/ आस्था/४०८-ई(१)/ 3660
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई-४०० ००८.
दिनांक जुलै २०१४.
06/08/14

महाव्यवस्थापक (आवेदन ), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.

प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

कार्यशाळा व्यवस्थापक, (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प.दापोडी,पुणे / औरंगाबाद / नागपूर.
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण),रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, मुंबई / ठाणे/ रत्नागिरी/ रायगड / सिंधुदुर्ग / पालघर/ जळगांव / धुळे / अहमदनगर / नाशिक/ पुणे/ सातारा/ सोलापूर/ कोल्हापूर / सांगली/ औरंगाबाद / बीड / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी/ जालना/ भंडारा / चंद्रपूर/ गडचिरोली /वर्धा/ नागपूर/ अमरावती / अकोला/ बुलढाणा/ यवतमाळ

विषय : चालक/ वाहक/ सहाय्यक (मदतनीस)/ ईशाराकार आणि प्रमुख यांत्रिकांच्या श्रेणीखालील सर्व कार्यशाळा कर्मचारी तसेच सहा. वाहतूक निरीक्षकांच्या श्रेणीखालील सर्व वाहतूक कर्मचारी यांचे सरासरी वेतनावर /अर्जित रजेबाबत.

----

प्रमुख यांत्रिकाच्या श्रेणीखालील सर्व कार्यशाळा कर्मचारी आणि सहाय्यक वाहतूक निरीक्षकांच्या श्रेणीखालील वाहतूक कर्मचारी व रोटरीमन श्रेणीखालील सर्व तिकीट मुद्रणालयातील कर्मचारी म्हणजे चालक / चालक (कनिष्ठ)/ वाहक/ वाहक (कनिष्ठ)/ ईशाराकार/ ईशाराकार (कनिष्ठ)/ वाहतूक नियंत्रक/ वाहतूक नियंत्रक (कनिष्ठ) / सहाय्यक / सहाय्यक (कनिष्ठ)/ सहाय्यक कारागिर/ सहाय्यक कारागिर (कनिष्ठ)/ कारागिर-क/ कारागिर-क (कनिष्ट)/ रोटरी मशिनमन/ मशिनमन/ बाईंडर/ सहाय्यक बाईंडर/ सहाय्यक (मुद्रणालय) व स्वच्छक या पदी काम करणारे कर्मचारी यांस सरासरी वेतनावर / अर्जित (पगारी) रजा देण्याबाबत कामगार करार १९९६-२००० मधील खंड २२-१ (ब) बाबत रा.प.महामंडळाने खालीलप्रमाणे समझोता केला आहे.

ब) चालक/ वाहक / सहाय्यक (मदतनीस) / ईशाराकर व प्रमुख यांत्रिकांच्या श्रेणीखालील सर्व कार्यशाळा कर्मचारी सहा.वाहतूक निरीक्षकांच्या श्रेणी खालील कर्मचारी यांना खालीलप्रमाणे रजा देण्यात येईल.

प्रत्येक कॅलेंडर वर्षात ४० दिवस पगारी रजा देण्यात येईल.त्यापैकी निम्मी रजा कामगाराने दरवर्षी मंदीच्या मोसमात घेणे आवश्यक असल्याचे स्थानिक प्रशासनाने सूचना फलकावर नोटीस लावून कळविले व त्यास रजेवर जाण्यासाठी मुक्त केले तर तसे करणे त्याच्यावर (कामगारावर ) बंधन कारक राहील .उरलेली रजा त्यास त्याच्या पसंती नुसार उपभोगता येईल.

१) तसेच आजारीपणात ४० दिवसापैकी १० दिवस पूर्ण पगारी रजेऐवजी २० दिवसांची अर्धपगारी रजा बदलून घेण्याची कामगारांना मोकळीक राहील. ही देवाणघेवाण एकाच हप्त्यात केली जाईल. परंतु, रजेचा कालावधी या कालावधीत येणा-या कोणत्याही सुटटीच्या दिवसासह असेल .

२) रोजंदार गट -१ व गट-२ वर काम करणा-या कर्मचा-यांना सध्या ज्याप्रमाणे रजा देण्यात येते ती तशीच यापुढेही देण्यात येईल.

-२-

PDF Compressor Free Version



सध्याच्या प्रचलीत पध्दतीनुसार संबंधित प्रवर्गातील कर्मचा-यांस कर्तव्यार्थ व्यतीत केलेल्या कालावधीसाठी ९ दिवसांना १ याप्रमाणे १ वर्षाला ४०^५/९ दिवस रजा त्यांचे खाती जमा करण्यात येत होती. अंकेक्षण अधिकारी यांनी कामगार करार १९९६-२००० मधील तरतुदीनुसार प्रत्येक कॅलेंडर वर्षात ४० दिवस रजा देण्याचे मान्य करुनही विभागामध्ये वर्षाला ४०^५/९ दिवस एवढी म्हणजे प्रत्यक्षात ५/९ पगारी रजेची जादा परिगणती होत असल्याबाबतचा लेखा आक्षेप अंकेक्षण अधिकारी यांनी उपस्थित केला होता. तरी, लेखा आक्षेप विचारात घेता, त्यातुन मार्ग काढण्यासाठी सध्याच्या पध्दतीनुसार अर्जित रजा परिगणनाच्या पध्दतीत बदल करुन सरासरी वेतनावर देय असलेली अर्जित (पगारी) रजा खालील सुत्रानुसार परिगणीत करण्यात यावी.

**<u>सरासरी वेतनावर / अर्जित रजा</u>**

१) प्रमुख यांत्रिकाच्या श्रेणीखालील सर्व कार्यशाळा कर्मचारी आणि सहाय्यक वाहतूक निरीक्षकांच्या श्रेणीखालील वाहतूक कर्मचारी व रोटरीमन श्रेणीखालील सर्व तिकीट मुद्रणालयातील कर्मचारी म्हणजे चालक /चालक (कनिष्ठ)/ वाहक/ वाहक (कनिष्ठ)/ ईशाराकार/ ईशाराकार (कनिष्ठ)/ वाहतूक नियंत्रक/ वाहतूक नियंत्रक (कनिष्ठ) / सहाय्यक / सहाय्यक (कनिष्ठ)/ सहाय्यक कारागिर/ सहाय्यक कारागिर (कनिष्ठ)/ कारागिर-क/ कारागिर-क (कनिष्ठ)/ रोटरी मशिनमन/ मशिनमन/ बाईंडर/ सहाय्यक बाईंडर/ सहाय्यक (मुद्रणालय) व स्वच्छक या प्रवर्गातील समय वेतनश्रेणीतील कर्मचा-यांस कर्तव्यार्थ व्यतीत केलेल्या कालावधीच्या प्रत्येक कॅलेंडर वर्षात ४० दिवस पगारी रजा देण्यात येईल.

२) अर्जित रजा परिगणना करण्यासाठी पूर्ण वर्षाला ४० दिवस याप्रमाणे प्रत्येक महिन्याला ४०/१२=३.३४ या दराने अर्जित रजा जमा करण्यात यावी.

३) एखाद्या कर्मचा-याची ६ महिन्यांची रजा परिगणीत करावयाची असेल, तर अ.क्र.२ मधील सुत्रानुसार ३.३४ X६=२०.०४ म्हणजेच २० दिवस इतकी होईल.

४) त्याचप्रमाणे अ.क्र.२ मधील सुत्रानुसार रजा परिगणीत करताना कर्तव्यावर व्यतीत केलेला कालावधी हा साप्ताहिक सुट्टी व रजा कालावधी धरुन परिगणीत करण्यात यावा.

**उदा:** एखाद्या कर्मचा-याची सरासरी वेतनावर/ अर्जित रजा त्यांचे खाती दिनांक ३१.१२.२०१३ रोजी २८० दिवस शिल्लक आहे, त्यांना माहे जानेवारी, २०१४ मध्ये एकुण ३१ दिवसांचा कालावधी कर्तव्यावर व्यतीत केलेला आहे, तर त्यांच्या दिनांक ०१.०२.२०१४ रोजी अर्जित रजा पुढीलप्रमाणे जमा होतील.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | दि.३१.१२.२०१३ रोजीची कर्मचा-याच्या खाती शिल्लक रजा | = | २८०.०० |
| ब) | माहे जानेवारी २०१४ कर्तव्यावर व्यतीत कालावधी करीता रजेची परिगणना अ.क्र.२ मधील सुत्रानुसार प्रत्येक महिन्याला (३.३४) याप्रमाणे अर्जित रजा दिनांक ०१.०२.२०१४ रोजी जमा होईल. | = | + ३.३४ |
| | | = | २८३.३४ |
| क) | माहे फेब्रूवारी २०१४ करीता जमा होणारी रजा कर्तव्यार्थ व्यतीत केलेल्या २८ दिवसाच्या कालावधी करीता प्रत्येक महिन्याला ३.३४ याप्रमाणे अर्जित रजा दि.०१.०३.२०१४ रोजी जमा होईल. | | +३.३४ |
| | | = | २८६.६८ |

-३-

PDF Compressor Free Version



रोजंदार गट -१ व गट-२ वर काम करणा-या कर्मचा-यांना सध्या ज्याप्रमाणे रजा देण्यात येते ती तशीच यापुढेही देण्यात येईल.

उपरोक्त परिपत्रकीय सूचना दिनांक १ जानेवरी, २०१४ पासून अंमलात येतील. सदरहू परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे सहमतीने प्रसारीत करण्यात येत आहे.

महाव्यवस्थापक (क.व.औ.स)

<u>प्रत माहितीसाठी सादर रवाना</u> : -

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (भा.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (यं.अ.)/ उप महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / उप महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) / उपमहाव्यवस्थापक (विधी)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य कामगार अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ/ जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिक / मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापक यांचे स्वीय सचिव / कर्मचारीवर्ग अधिकारी / सहा. कर्मचारीवर्ग अधिकारी(मुख्यालय)/(प्रशासन/सा.प्रशासन)/(मनुष्यबळ नियोजन / समन्वय) / (राज्यसंवर्ग) / (घटकसंवर्ग)/(मावक) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

D:\vijay kadav\Leave\Circular

PDF Compressor Free Version

**कर्मचारीवर्ग खाते**
परिपत्रक क्र.१० /२०१४

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/वैद्य./ 3249
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई सेंट्रल,मुंबई-४०० ००८.
दिनांक: 20/4/२०१४.

महाव्यवस्थापक (आवेदन),प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण)रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,दापोडी,पुणे/औरंगाबाद/नागपूर.
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
ठाणे/ मुंबई/पालघर/रायगड /रत्नागिरी /सिंधुदूर्ग /नाशिक /जळगांव/ धुळे /अहमदनगर /
पुणे/सातारा /सांगली/कोल्हापूर /सोलापूर /औरंगाबाद /जालना /बीड /लातूर /उस्मानाबाद /परभणी/ नांदेड /
अमरावती / अकोला / बुलढाणा / यवतमाळ /नागपूर / वर्धा / भंडारा / चंद्रपूर / गडचिरोली.

**विषयः परिपत्रक ९/८७ व ११५/११६ अंतर्गतच्या वैद्यकीय देयकांबाबत.**
**संदर्भः १)परिपत्रक क्र.७/१९९० जा.क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/१४७० दि.२८.०२.१९९०.**
**२)परिपत्रक क्र.३२/२००६ जा.क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/५३११ दि. ५.१२.२००६.**
**३)परिपत्रक क्र.३१/२००६ जा.क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/५३१२ दि. ५.१२.२००६.**

--------

९/८७ व ११५/११६ अंतर्गत येणारी वैद्यकीय देयके मध्यवर्ती कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येतात. त्याबाबत संदर्भित परिपत्रकान्वये सर्व विभागांना यापूर्वीच सुचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत. तरीही वैद्यकीय देयके पाठविताना त्यामध्ये ब-याचशा त्रुटी आढळतात,व त्याची पूर्तता करण्यासाठी सदर देयके पुन्हा विभागास पाठविली जातात. त्यामुळे संबंधित रकमेची प्रतिपूर्ती मिळण्यास विलंब होतो व त्यामुळे कर्मचा-यांना तक्रारीस वाव मिळतो. तसेच कार्यालयीन वेळेचाही अपव्यय होतो. तरी यापुढे वैद्यकीय देयके मध्यवर्ती कार्यालयास पाठविताना खालील बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यास त्रुटी उदभवणार नाहीत,व देयकांचा लवकर निपटारा होईल.

९/८७ व ११५/११६ ची वैद्यकीय देयके पाठविताना खालील त्रुटी आढळून आल्या आहेत.

१) देयकांच्या फाईल व्यवस्थित फाईल केलेल्या नसतात. तसेच प्रत्येक पानावर अनुक्रमांक लिहीलेला नसतो.
२) कामगार अधिकारी/ व विभाग नियंत्रक यांची वैद्यकीय देयकावर सही नसते.
३) मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांची देयकावर शिफारस केलेली नसते.
४) मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांचा खर्च वाजवी असल्याचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
५) सेवा विनियम ११५/११६ अंतर्गत पाठविण्यात येणा-या काही वैद्यकीय देयकांसोबत अपघात वृत्त नसते. तसेच विभाग नियंत्रक / आगार व्यवस्थापक यांची खाजगी रुग्णालयात औषधोपचार करुन घेण्याबाबतचे परवानगी पत्र जोडलेले नसते/
६) परिपत्रक क्र.२६/२००६ मधील सुचनांनुसार लेखा परीक्षण केलेले आढळून येत नाही.
७) लेखा परीक्षण न करता देयके या कार्यालयाकडे पाठविली जातात.
८) लेखा परीक्षण केलेले असते,परंतू बिलांवर लेखा परीक्षणाचा शिक्का व सही नसते.
९) लेखा परीक्षणाच्या नकला जोडण्यात येत नाही.
१०) डॉक्टरांचा कॅश मेमो व मूळ स्टीकर (Original) पाठविण्यात येत नाही.

तसेच ज्या विभागांना वैद्यकीय देयके पोस्टाने पाठवावी लागतात, अशा देयकांसाठी पोस्टल चार्जेस आकारण्यात येतो. त्यामुळे महामंडळास आर्थिक नुकसान होते.

PDF Compressor Free Version



तरी सर्व विभागांनी ९/८७ व १९५/१९६ ची वैद्यकीय देयके या कार्यालयास पाठविताना वरील ...ी राहणार नाहीत,याची दक्षता घेण्यात यावी व परिपूर्ण वैद्यकीय देयकेच या कार्यालयास ...ठविण्यात यावीत, याची नोंद घेण्यात यावी.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

...त रवाना:

...ख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /
...व्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां. व ख) / महाव्यवस्थापक (यं.अ) /
...महाव्यवस्थापक (नियोजन) / उप महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) / उप महाव्यवस्थापक(विधि) /
...कायदा सल्लागार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य स्थापत्य अभियंता /
...जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक /
...प्र कर्मचारीवर्ग अधिकारी (संग)/उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सहाय्यक /
...यांचे स्वीय सहाय्यक/मुख्य मानसेवी वैद्यकीय अधिकारी / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी
...(मनुष्यबळ) / (घटक संघटना) / (प्रशासन) (सामान्य प्रशासन) यांचे माहितीसाठी.

महाव्यवस्थापक (क.व औ. सं)

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक १२/२०१४

क्र.रापा/कर्मवर्ग/मावक/ ६९२९
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :- ०५ सप्टेंबर,२०१४

महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय पुणे

उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी पुणे

प्रादेशिक व्यवस्थापक
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

विभाग नियंत्रक,
म.रा.मा.प.महामंडळ,
मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदुर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - १)महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिक दृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थामधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे)आरक्षण अध्यादेश,२०१४.
२) महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए)करिता राज्यातील शैक्षणिक संस्थामधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश,२०१४
३)शुध्दिपत्र

संदर्भ - १) सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३, दिनांक ०९ जुलै,२०१४
२) सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४, दिनांक ०९ जुलै,२०१४
३) दिनांक १४ जुलै,२०१४ चे शुध्दिपत्र

*****

उपरोक्त विषयाबाबत सचिव (साविस) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय मुंबई यांचे अ.शा.पत्र.क्रमांकबीसीसी-२०१४/प्र.क्र.२३१ A/१६-ब दिनांक ११ जुलै,२०१४ ची प्रत व त्यासोबत संदर्भित अध्यादेशांच्या प्रती माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडल्या आहेत.

तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती),भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ दिनांक २२ जानेवारी,२००४)ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील अध्यादेशाची /अधिनियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

सोबत : वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (कं.व औ.सं.)

PDF Compressor Free Version



<u>प्रत सादर रवाना</u> :-

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ उप महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिक /मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन) सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/समन्वय)/(घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन/प्रशासन) यांचे माहितीसाठी. उपरोक्त संदर्भित अध्यादेशांच्या /अधिनियमाच्या प्रती यासोबत जोडल्या आहेत.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त संदर्भित अध्यादेशांच्या /अधिनियमाच्या प्रती यासोबत जोडल्या आहेत.

सोबत : वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

PDF Compressor Free Version

महाराष्ट्र शासन

अ.शा.पत्र क्रमांक: बीसीसी-२०१४/प्र.क्र.२३१ A/१६-ब
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, २०१४

प्रमोद त्र्यं. नलावडे,
सचिव(साविस)

विषय :- १) सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १३, दिनांक ९ जुलै, २०१४.
२) सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १४, दिनांक ९ जुलै, २०१४.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय अध्यादेशांच्या प्रती सोबत जोडण्यात येत आहेत. त्यांचे कृपया अवलोकन करावे.

२. विषयांकित अनुक्रमांक १ येथील, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश २०१४ अन्वये, अल्पसंख्यांक वर्गाच्या शैक्षणिक संस्था व्यतिरिक्त अन्य शैक्षणिक संस्था तसेच खाजगी शिक्षण संस्थामधील प्रवेशाच्या एकूण जागांपैकी १६ टक्के जागा तसेच राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील सरळसेवेने भरती करावयाच्या एकूण पदांपैकी/नियुक्त्यांपैकी १६ टक्के पदे/नियुक्त्या हया मराठा समाजाचा अंतर्भाव असलेल्या शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता राखून ठेवण्यात आलेल्या आहेत.

३. विषयांकित अनुक्रमांक २ येथील, विशेष मागास प्रवर्ग (एसबीसी-ए) करिता राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश २०१४ अन्वये, अल्पसंख्यांक वर्गाच्या शैक्षणिक संस्था व्यतिरिक्त अन्य शैक्षणिक संस्था तसेच खाजगी शिक्षण संस्थामधील प्रवेशाच्या एकूण जागांपैकी ५ टक्के जागा तसेच राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील सरळसेवेने भरती करावयाच्या एकूण पदांपैकी/नियुक्त्यांपैकी ५ टक्के पदे/नियुक्त्या ज्यांना या पूर्वीच मागासवर्ग आणि इतर मागास वर्गाखाली आरक्षण देण्यात आलेले आहे, अशा मुस्लीम प्रवर्गाव्यतिरिक्त, सदर अध्यादेशासोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राज्यातील विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता असणाऱ्या मुस्लीम समाजाकरिता राखून ठेवण्यात आलेल्या आहेत.

PDF Compressor Free Version

४. उपरोक्त दोन्ही अध्यादेशांच्या अनुषंगाने आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या बाबींसंदर्भात आवश्यक ती कार्यवाही आपल्या विभागाने तातडीन करावी तसेच या संदर्भात विभागाशी संबंधित असलेले शासन निर्णय/शासन परिपत्रक/शासन अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही देखील विभागाने त्वरित करावी.

आवश्यक!

आपला, विश्वासू

( प्रमोद त्र्यं. नलावडे )

श्री.एस. के. शर्मा,
प्रधान सचिव,
परिवहन व बंदरे-राज्य उत्पादन शुल्क विभाग(अतिरिक्त कार्यभार)

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक ९३ /२०१४

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ४९२२
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :- ०५ सप्टेंबर,२०१४.

महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय पुणे
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
विभाग नियंत्रक,
म.रा.मा.प.महामंडळ,
मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदुर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/
जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/
गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल क्र.२२ आणि राज्यात शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (शै.सा.मा.प्र.)Educationally and Socially Backward Category (ESBC) तयार करुन त्या प्रवर्गांतर्गत मराठा समाजाचा समावेश करण्याबाबत.

संदर्भ - कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १२/२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४९२१ दिनांक ०५ सप्टेंबर,२०१४

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांकःसीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक दिनांक १५ जुलै,२०१४ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

सोबत : वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (कि.व औ.सं.)

प्रत सादर रवाना :-

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ उप महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिक /मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/समन्वय)/(घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन/प्रशासन) यांचे माहितीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (कि.व औ.सं.)

PDF Compressor Free Version

**राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल क्र. २२ आणि राज्यात शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (शै. सा. मा.प्र.) Educationally and Socially Backward Category (ESBC) तयार करून त्या प्रवर्गातंर्गत मराठा समाजाचा समावेश करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/ मावक
मंत्रालय विस्तार भवन मुंबई -३२
दिनांकः १५ जुलै २०१४

<u>वाचाः-</u>

**शासन सामान्य प्रशासन विभाग,सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३ दि. ९ जुलै २०१४**

<u>प्रस्तावनाः-</u>

भारतातील आरक्षण संकल्पनेचे जनक म्हणून ओळखले जाणारे राजर्षी शाहू महाराज यांनी सन १९०२ मध्ये करवीर संस्थानात सरकारी नोक-यामध्ये मागासवर्गीयांना आरक्षणाची तरतूद केली होती. त्यामध्ये मराठा समाजाचाही समावेश केला होता. त्यानंतर ब्रिटिशकालीन मुंबई प्रांताच्या दि. २३ एप्रिल १९४२ च्या निर्णयाव्दारे मराठा व इतर जातीसह एकूण २२८ जाती मध्यम व मागास समाज म्हणून घोषित केल्या होत्या. सदर शासन निर्णयाला जोडलेल्या सुचीत अ. क्र. १४९ येथे मराठा समाज दाखविण्यात आला आहे. सन २००४ मध्ये मराठा आरक्षणाचे प्रकरण महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे त्यांच्या शिफारशीसाठी विचारार्थ पाठविले होते. न्या. आर. एम. बापट यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मागासवर्ग आयोगाने सन २००८ मध्ये मराठा आरक्षणाबाबत अहवाल क्र. २२ शासनास सादर केला होता .सदर अहवालात मराठा समाजाला इतर मागासवर्ग या प्रवर्गात आरक्षण देता येणार नाही असे नमुद करण्यात आले आहे. त्या अहवालावर मंत्रीमंडळाच्या उपसमितीने तपशीलवार विचारविनिमय केल्यानंतर मराठा समाजाचा शैक्षणिक व सामाजिक मागासलेपणा याबाबतची आयोगाने गोळा केलेली अपुरी साधार माहिती या मुद्यावर अहवाल सादर करण्यासाठी हे प्रकरण आयोगाकडे परत पाठविण्यात आले. तसेच विद्यमान आरक्षणास बाधा न पोहोचविता मराठा समाजाला आरक्षण देता येईल किंवा कसे याबाबत मत देण्याची विनंती केली होती. त्यावर आयोगास अहवाल सादर करण्याची वारंवार विनंती केल्यानंतरही आयोगाने केवळ २२ व्या अहवालावर महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम २००५ च्या कलम ९ (२) नुसार निर्णय घेण्याचा आग्रह धरला होता.

दरम्यानच्या काळात राज्यातील मराठा समाजाचा इतर मागासवर्ग प्रवर्गामध्ये समावेश करण्यासंदर्भात योग्य त्या शिफारशी करण्यासाठी मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने राज्यातील मराठा समाजाचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक सर्वेक्षण करून साधार माहितीसह अहवाल शासनास सादर केलेला आहे. त्यामध्ये मराठा समाज हा सामाजिक , आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदर अहवालाची प्रत राज्य मागासवर्ग आयोगास देऊन विद्यमान आरक्षणाला बाधा न पोहोचविता

PDF Compressor Free Version



शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत अभिप्राय देण्याची पुन्हा विनंती करण्यात आली. त्यावर आयोगाने दि. २० मे २०१४ च्या पत्रान्वये शासनास आयोगाचा अहवाल क्र. २२ वर निर्णय घेण्याची विनंती केली आहे. वरील पार्श्वभुमी पाहता राज्य मागासवर्ग आयोग याबाबतीत निर्णय घेण्यास अनुकूल नाही असे मानण्यास वाव असल्याने शासनाने जवळजवळ एक दशक प्रतिक्षा केल्यानंतर मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेण्याचे ठरविले. शासनाने दि. २५ जुन २०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य मागासवर्ग आयोगाचा २२ वा अहवाल अंशतः नाकारण्याचा व मराठा समाज शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला असल्याने तो महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम २००५ च्या कलम ९ (२) नुसार आरक्षणास पात्र आहे या फेरबदलासह तो स्विकारण्याचा निर्णय घेतला. आयोगाचा अहवाल क्र. २२, खालील कारणामुळे शासनाकडून अंशतः नाकारण्यात येत आहे.

१) साधार माहितीचा (Quantifiable Data) अभाव

२) आयोगातील सदस्यांमध्ये मतभिन्नता

३) साधार माहिती (Quantifiable Data) जमविण्यासाठीच्या शासनाच्या वारंवार केलेल्या विनंतीवर आयोगाकडून प्रतिसादाचा अभाव व शासनाने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग २००५ च्या कलम ९ (२) प्रमाणे काय कार्यवाही केली आहे एवढीच आयोगाकडून विचारणा व निर्णय घेण्याची सुचना

४) मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत साधार माहिती उपलब्ध झाल्यानंतर देखील अभिप्राय देण्यास विलंब

मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने गोळा केलेल्या तथ्यांच्या व साधार माहितीच्या आधारे मराठा समाज हा सामाजिक , आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास आहे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमध्ये व शिक्षणात अपुरे प्रतिनिधीत्व आहे. त्यामुळे या समाजास नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी आरक्षण आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे.

राज्यातील अनुसुचित जाती , अनुसुचित जमाती, विमुक्त जाती ,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग वगळून राज्यात शैक्षणिक व सामाजिक मागासलेपणाच्या कारणावरून शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग असा नवीन प्रवर्ग तयार करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**<u>शासन निर्णयः-</u>**

राज्यात शैक्षणिक व सामाजिक मागासलेल्या समाजासाठी भारतीय राज्य घटनेच्या १५ (४), १५ (५) , १६ (४) व ४६ नुसार **शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (शै. सा. मा.प्र.) Educationally and Socially Backward Category (ESBC)** असा नवीन प्रवर्ग तयार करण्यात येत आहे. या प्रवर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात येत आहे. सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ दिनांक ९ जुलै २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गातंर्गत मराठा समाजास शासकीय/ निमशासकीय सेवा ( सरळसेवा भरतीसाठी) व शैक्षणिक संस्थामध्ये १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.त्यानुसार शालेय शिक्षण , उच्च व तंत्रशिक्षण , वैद्यकीय शिक्षण आणि कृषी व पशुसवर्धन विभागांतर्गत शासकीय तसेच खाजगी

PDF Compressor Free Version



अनुदानित व विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त १६ टक्के आरक्षण शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गातर्गत मराठा समाजास देण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण उन्नत व प्रगत ( क्रिमिलेयर) घटकांना लागू होणार नाही. या प्रवर्गाला इतर मागासवर्गाप्रमाणेच ( राजकीय आरक्षण वगळून) सर्व सुविधा मिळतील. शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवेत आरक्षण लागू करण्याची अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग (सामाजिक विकास समन्वय) यांच्याकडून निर्गमित करण्यात यावी व त्याप्रमाणे सरळसेवेसाठी दि. २९ मार्च १९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदूनामावलीत आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही अनुक्रमे शालेय शिक्षण विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभागाने करावी. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने करावी. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित कृषी विद्यापीठातील व पशु वैद्यकीय शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही कृषी व पदुम विभागाने करावी.सदरचे आरक्षण मा. राज्यपाल यांच्या दि. ९ जुन २०१४ च्या अधिसुचनेनुसार अधिसुचित विभागांना व पदाना लागू होणार नाही.

या प्रवर्गामध्ये जातींना जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याची कार्यपध्दती इतर मागासवर्गासाठी असलेल्या जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याच्या कार्यपध्दतीसारखीच राहील. या प्रवर्गासाठी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रासाठी इतर मागासवर्ग या प्रवर्गाप्रमाणे महाराष्ट्रातील वास्तव्याचा दिनांक १३ ऑक्टोंबर १९६७ असा राहील. यासाठी या प्रवर्गातील व्यक्तींना द्यावयाच्या जात प्रमाणपत्राचा नमुना सोबत परिशिष्ट अ मध्ये जोडला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०७१६११०३४९९३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(रा. द. शिंदे)**
**सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) खाजगी सचिव, मा. मुख्यमंत्री, मंत्रालय
२) खाजगी सचिव, मा. उपमुख्यमंत्री, मंत्रालय
३) खाजगी सचिव, मा. मंत्री ( सामाजिक न्याय), मंत्रालय
४) खाजगी सचिव, मा. मंत्री (महसुल ), मंत्रालय
५) खाजगी सचिव, मा. मंत्री (उद्योग ), मंत्रालय

PDF Compressor Free Version



६) खाजगी सचिव, मा. मंत्री (आदिवासी विकास ), मंत्रालय
७) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (सामान्य प्रशासन विभाग ), मंत्रालय
८) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री ( सामाजिक न्याय), मंत्रालय
९) विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई,
१०) विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
११) अप्पर मुख्य सचिव, सा.प्र. विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) अप्पर मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) अप्पर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) प्रधान सचिव (सेवा), सा.प्र. विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८) सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई,
१९) सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, जी. टी. हॉस्पिटल, मुंबई
२०) सचिव (सा. वि. स. ), सा.प्र. विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२२) महालेखापाल, महाराष्ट्र- १, मुंबई,
२३) महालेखापाल, महाराष्ट्र- २,नागपूर,
२४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२५) मुख्य महानगर दंडाधिकारी,
२६) सर्व विभागीय आयुक्त,
२७) सर्व जिल्हाधिकारी,
२८) सर्व उप विभागीय दंडाधिकारी, (महसुल)
तथा उप विभागीय अधिकारी,
२९) सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
३०) प्रबंधक , उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
३१) प्रबंधक , उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, मुंबई,
३२) प्रबंधक , उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ - नागपूर,
३३) प्रबंधक , उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, नागपूर,
३४) प्रबंधक , उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ औरंगाबाद,
३५) प्रबंधक , उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, औरंगाबाद,
३६) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३७) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
३८) संचालक, विजाभज, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३९) संचालक, उच्च तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४०) संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४१) संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४२) संचालक, आदिवासी कल्याण , महाराष्ट्र राज्य, नाशिक,
४३) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
४४) सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे
४५) सर्व मंत्रालयीन विभाग / सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य

PDF Compressor Free Version



त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.

४६) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, / सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण

४७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

४८) सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी,

४९) सर्व अध्यक्ष/सदस्य सचिव,विभागीय जात पडताळणी समिती क्रमांक १, २, ३

५०) महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय मुंबई,

५१) निवड नस्ती, का- मावक

PDF Compressor Free Version



परिशिष्ट – अ

Form of certificate to be issued to Educationally and Socially Backward Category persons belonging the state of Maharashtra.

Documents verified :- (1)

(2)

(3)

(4)

**CASTE CERTIFICATE**

This is to certify / that shri/shrimati/kumari *______________________________

son /daughter * of _________________ of village/Town *____________________

in District/Division *______________________________________________ of the

state of Maharashtra belongs to the ________________________caste which is

recognised as Educationally and Socially Backward Category under Goverment

Resolution _________________ Department No. ____________________ dated

_________________________ as amended from time to time.

2. Shri / Shrimati / Kumari *_____________________________________

and / or his / her * family ordinarily reside (s) in village / Town ____________

________________________ of ____________________district / division of the

State of Maharashtra.

Signature ________________________

Designation ______________________

With seal of office.

Place ______________

Date ______________

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक १४/२०१४

क्र. राप/कर्मवर्ग/मावक/ ४९२३
म.रा.मा.प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :- ०५ सप्टेंबर, २०१४

महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय पुणे
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी पुणे

प्रादेशिक व्यवस्थापक
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

विभाग नियंत्रक,
म.रा.मा.प. महामंडळ,
मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदूर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - शासकीय/निमशासकीय सेवांमध्ये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत.

संदर्भ - कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १२ /२०१४
क्र. राप/कर्मवर्ग/मावक/४९२१ दिनांक ०५ सप्टेंबर, २०१४

*****

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय क्र.अविवि २०१४/प्र.क्र.८१/का-७ दिनांक १९ जुलै, २०१४ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

सोबत : वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत सादर रवाना :-

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ उप महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिक /मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/समन्वय)/(घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन/प्रशासन) यांचे माहितीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

PDF Compressor Free Version

**शासकीय / निमशासकीय सेवांमध्ये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**अल्पसंख्याक विकास विभाग**

**शासन निर्णय क्र.अविवि २०१४/प्र.क्र. ८१/का-७**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १९ जुलै, २०१४

**वाचा : सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१४, दि.९ जुलै, २०१४.**

**<u>प्रस्तावना :-</u>**

१) महाराष्ट्र राज्य हे वंचितांसाठी आरक्षणाची तरतूद करणारे अग्रेसर राज्य आहे आणि नागरिकांचे मागासवर्ग यांमधील लोकांच्या सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीकरिता राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या किंवा पदांच्या आरक्षणासाठी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून, महाराष्ट्र राज्यात आरक्षण धोरण अंमलात आहे.

२) भारतातील आरक्षणाच्या संकल्पनेचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांनी १९०२ या वर्षी, सरकारी नोकऱ्यांमध्ये जागा राखून ठेवण्यासाठी सुरुवातीला दोन अधिसूचना काढल्या होत्या. १९०२ च्या उक्त दोन अधिसूचनांमध्ये मागासवर्ग म्हणून मुस्लिम समाजासाठी आरक्षणाची तरतूद केली होती. तत्कालिन बॉम्बे शासनाने दिनांक २३ एप्रिल, १९४२ रोजी काढलेल्या निर्णयात, सुमारे २२८ समाजाला मध्यम व मागासवर्ग म्हणून घोषित केले होते व त्या निर्णयाला जोडलेल्या सूचीमध्ये मुस्लिम समाजाला अनुक्रमांक १५५ वर दाखविण्यात आले आहे.

३) भारत सरकारने, न्यायमूर्ती सच्चर समिती नियुक्त करुन त्याद्वारे देशातील धार्मिक अल्पसंख्याक वर्गाच्या स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी तपशीलवार अभ्यास पूर्ण केला आणि सच्चर समितीने, सन २००६ मध्ये भारत सरकारला आपला अहवाल सादर केला आणि शिक्षण व राज्याच्या नियंत्रणाखालील सेवा यांमध्ये संधी देऊन मुस्लिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विवक्षित शिफारशी केल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने दिनांक ६ मे, २००८ च्या आपल्या निर्णयान्वये,

PDF Compressor Free Version



महाराष्ट्रातील मुस्लिमांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणाचा विचार करण्यासाठी आणि शासनाकडून करता येतील अशा सुधारात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.मेहम्मद-उर-रेहमान यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट गठीत केला होता. डॉ.रेहमान समितीने, सन २०१३ मध्ये सादर केलेल्या आपल्या अहवालात, इतर गोष्टींबरोबरच, राज्य शासनाच्या सेवांमध्ये व शैक्षणिक संस्थांमध्ये मागास मुस्लिमांसाठी किमान आठ टक्के आरक्षणाची शिफारस केली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या मुस्लिमांना शासकीय /निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीकरिता व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरीता आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

## शासन निर्णयः-

राज्यात शैक्षणिक व सामाजिक मागासलेल्या समाजासाठी भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद १५ (४), १५(५), १६(४) व ४६ मधील तरतुदीनुसार विशेष मागास प्रवर्ग (अ) (Special Backward Category-A) निर्माण करुन त्यामध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटाचा समावेश करण्यात येत आहे. शासन अध्यादेश क्रमांक १४ दि. ९ जुलै, २०१४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या मुस्लिम गटासाठी विशेष मागास प्रवर्ग-अ अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५% आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

**(अ)** त्यानुसार भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद १६ (४) मधील तरतुदीनुसार शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरती मध्ये सध्या राज्यात अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त ५% आरक्षण नव्याने निर्माण करण्यात आलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ (Special Backward Category-A) या प्रवर्गाला देण्यात येत आहे.

**(ब)** भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १५(१), १५ (४), १५ (५) व ४६ मधील तरतुदीनुसार शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी व पशु वैद्यकीय विभागांतर्गत शासकीय तसेच खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशात सध्या राज्यात अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त ५% आरक्षण नव्याने निर्माण करण्यात आलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ (Special Backward Category-A) या प्रवर्गाला देण्यात येत आहे.

PDF Compressor Free Version



१. सदरचे आरक्षण भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेल्या अल्पसंख्याक वर्गाच्या शैक्षणिक संस्थांना लागू राहणार नाही.

२. हे आरक्षण क्रिमीलेअर घटकांना लागू होणार नाही.

३. अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गामधील मुस्लिम समुदायातील ज्या घटकांना आरक्षणाचा लाभ यापूर्वी देण्यात आला आहे त्यांना आरक्षण पूर्वीप्रमाणे सुरु राहील व त्यांना वि.मा.प्र.-अ मधील ५% आरक्षणाचा फायदा मिळणार नाही.

४. आरक्षणाचा फायदा सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेल्या मुस्लिम समाजातील एकूण ५० मागास घटकासाठी अनुज्ञेय राहील.

५. शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवेत आरक्षण लागू करण्याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग (सामाजिक विकास समन्वय) यांनी करावी व त्याप्रमाणे सरळसेवेसाठी दि.२९ मार्च, १९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीत आवश्यक त्या सुधारणा कराव्यात.

६. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही अनुक्रमे शालेय शिक्षण विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाने करावी.

७. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित वैद्यकीय शिक्षण शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने करावी.

८. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित कृषी विद्यापीठातील व पशु वैद्यकीय शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही कृषी व पदुम विभागाने करावी.

९. सदरचे आरक्षण मा.राज्यपाल यांच्या दिनांक ९ जून, २०१४ च्या अधिसूचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील अधिसूचित पदांना लागू रहाणार नाही.

१०. आरक्षणाची अंमलबजावणी होण्यासाठी वि.मा.प्र.-अ प्रवर्गातील उमेदवारांच्या जातीचे प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्रासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने आवश्यक त्या सूचना संबंधित यंत्रणेस निर्गमित कराव्यात.

विशेष मागास प्रवर्ग-अ (Special Backward Category-A) मध्ये समाविष्ट असणाऱ्या मुस्लिम समाज घटकांची अनुसूची सोबत जोडली आहे.

PDF Compressor Free Version



सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०७१९१२२९२९९११४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ. पी. एस. मीना)

शासनाचे अपर मुख्य सचिव.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
६. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
७. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
८. सचिव, शालेय शिक्षण विभाग,
९. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
१०. प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग,
११. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
१२. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
१३. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
१४. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
१५. बंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),खंडपीठ,नागपूर,
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), नागपूर,

PDF Compressor Free Version



१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),खंडपीठ औरंगाबाद,

१८. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), खंडपीठ औरंगाबाद,

१९. महालेखापाल, महाराष्ट्र- १ मुंबई,

२०. महालेखापाल, महाराष्ट्र- २ नागपूर,

२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुबई,

२२. सर्व विभागीय आयुक्त,

२३. सर्व जिल्हाधिकारी,

२४. संचालक (प्राथमिक), शालेय शिक्षण संचालनालय, पुणे,

२५. संचालक, (माध्यमिक), शालेय शिक्षण संचालनालय, पुणे,

२६. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे,

२७. संचालक, मागासवर्ग आयोग,

२८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२९. सर्व मंत्रालयीन विभाग

३०. त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्य अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

३१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)

३२. निवडनस्ती.

PDF Compressor Free Version



# अनुसूची

## विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | धोबी मुस्लिम किंवा मुस्लिम धोबी किंवा धोबी मुसलमान. | २६ | फरुकी किंवा फारुकी. |
| २ | गराडी मुस्लिम किंवा गारोडी. | २७ | सिद्दीकी किंवा सिद्दीक. |
| ३ | नाई मुस्लिम, नावीद किंवा नावीक. | २८ | मालवी. |
| ४ | शेख किंवा शेक. | २९ | मीर. |
| ५ | मुघल किंवा मुगल. | ३० | हकीम. |
| ६ | सय्यद (सेद, सयद आणि सय्यद). | ३१ | मुल्ला किंवा मुल्लाजी, भोरी-मुल्लाजी. |
| ७ | पठाण. | ३२ | जमादार. |
| ८ | खान. | ३३ | मुकादम. |
| ९ | काद्री किंवा खाद्री. | ३४ | नकवी. |
| १० | पिरजादे किंवा पीरजादे. | ३५ | रिजवी किंवा रिज्वी. |
| ११ | मौलवी किंवा मौलाना. | ३६ | रिझवी किंवा राज्वी. |
| १२ | खाकरुब किंवा फरास. | ३७ | हुसैन किंवा हुसैनी. |
| १३ | मिर्झा. | ३८ | कामली किंवा कासमी. |
| १४ | बेग किंवा बैग. | ३९ | मेहंदी किंवा मेहदी. |
| १५ | अहमदी. | ४० | हैदरी. |
| १६ | नक्षबंदी किंवा नकाशबंदी किंवा नक्शबंदी. | ४१ | आलवी किंवा अलवी. |
| १७ | मच्छिमार मुस्लिम. | ४२ | उस्मानी. |
| १८ | तांडेल मुस्लिम. | ४३ | नूरी. |
| १९ | पटवा मुस्लिम. | ४४ | रहमानी. |
| २० | कागजी मुस्लिम किंवा कागडी मुस्लिम. | ४५ | मोहम्मदी किंवा मोहाम्मदी. |
| २१ | काझी. | ४६ | चाऊस किंवा चाउस. |
| २२ | टाकणकर. | ४७ | फकीह. |
| २३ | चिश्ती. | ४८ | सुफी किंवा वार्स किंवा अशर्फी. |
| २४ | मुस्लिम शाह. | ४९ | शूतारी किंवा सतारी मुस्लिम. |
| २५ | मुस्लिम पटेल. | ५० | ख्वाजा (अजमेरी, बग्दादी, मदनी, मक्की किंवा तुर्की). |

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक १५/२०१४

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ४९३३
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :- ०६ सप्टेंबर,२०१४

महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय पुणे
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
विभाग नियंत्रक,
म.रा.मा.प.महामंडळ,
मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदुर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.

संदर्भ - १)कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १२ /२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१२१ दिनांक ०५ सप्टेंबर,२०१४
२)कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १३ /२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१२२ दिनांक ०५ सप्टेंबर,२०१४
३)कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १५/१९९७
क्र.राप/आस्था/माजा-२/२८०४ दिनांक २०.०५.१९९७

*****

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब दिनांक २४ जुलै,२०१४ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

**सोबत : वरीलप्रमाणे**

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत सादर रवाना :-

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ उप महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिक /मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/समन्वय)/(घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन/प्रशासन) यांचे माहितीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राजपत्रित) / (मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

**सोबत : वरीलप्रमाणे**

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

PDF Compressor Free Version

शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास
(ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या
तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी
सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
**शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब**
**दिनांक : २४ जुलै, २०१४.**

**वाचा:-**

१. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४.
२. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दि.१५ जुलै,२०१४.
३. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती , विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१.
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७.

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश २०१४ **(सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३)** अन्वये **"शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग"** निर्माण करण्यात आला आहे, सदर अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार या प्रवर्गास सरळसेवेच्या पदभरतीमध्ये १६ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

उक्त अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १५ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी १६ टक्के आरक्षणास अनुसरून, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात उक्त अध्यादेशातील कलम ८ (१) नुसार सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

PDF Compressor Free Version



**<u>शासन निर्णय :-</u>** शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी (ईएसबीसी) संदर्भाधीन क्रमांक १ येथील अध्यादेशानुसार १६ टक्के आरक्षण लागू करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.१५ जुलै,२०१४ च्या शासन निर्णयान्वये, राज्यात शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास समाजासाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम १५(४), १५(५), १६(४) व ४६ नुसार शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (शै.सा.मा.प्र.) (Educationally and Socially Backward Category) (E.S.B.C.) असा नवीन प्रवर्ग तयार करण्यात आल्याचे व या प्रवर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात आल्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्याअनुषंगाने शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (शै.सा.मा.प्र.) (Educationally and Socially Backward Category) (E.S.B.C.) प्रवर्गासाठी, राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय / निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १६ टक्के आरक्षण विहित करण्यात येत आहे. त्यानुसार शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब दि.२९.३.१९९७ अन्वये विहित करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारित करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक १ येथील,दिनांक ९ जुलै, २०१४ चा अध्यादेश प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून, शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसंदर्भात सोबतच्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित करण्यात येत असलेल्या सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करण्यात यावा.

३. गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गातील कर्मचा-यांची संबंधित प्रवर्गाच्या आरक्षित पदावर गणना करण्यात येऊ नये. त्यांची नियुक्ती संबंधित आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्यांची नोंद खुल्या प्रवर्गातील बिंदुवर दर्शविण्यात यावी.

४. शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी (ईएसबीसी) सरळसेवेने भरण्यात येणारी १६ टक्के आरक्षणाची पदे दिनांक ९ जुलै, २०१४ पासून भरणे आवश्यक आहे. त्यामुळे संवर्गामध्ये दिनांक ९ जुलै २०१४ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोटयातील रिक्त होणारी पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षाकरिता शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) या प्रवर्गाकरीता आरक्षणाची गणना करतांना ,सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

५. संदर्भीय सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ मधील कलम १८ (१) नुसार, या अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी म्हणजेच दिनांक ९ जुलै, २०१४ पूर्वीच सरळसेवा भरतीमधील निवड प्रक्रिया सुरू झाली असेल,

PDF Compressor Free Version



अशा प्रकरणांना या अध्यादेशाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. अशा प्रकरणांच्या बाबतीत, सदर अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि आरक्षण अधिनियम,२००१ मधील ज्या तरतुदी लागू होत्या, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. दि.९ जुलै २०१४ पूर्वी ज्या प्रकरणी सरळसेवा भरतीच्या प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झालेली आहे, त्याचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही. यापुढे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सरळसेवा भरतीसाठी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** नुसार सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करावा. पूर्वीपासून आरक्षण लागू असलेल्या मागासप्रवर्गांचा अनुशेष असल्यास तो सरळसेवा भरतीच्यावेळी विचारात घेण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,शासकीय अनुदान प्राप्त संस्था,विद्यापीठे,सहकारी संस्था , शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

८. सरळसेवेव्दारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत, वरील प्रमाणे बिंदुनामावलीचा अवलंब करताना, सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

हे आदेश दिनांक ९ जुलै, २०१४ पासून अंमलात येतील.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१४०७२४१७२४५५४७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(प्रमोद त्र्यं. नलावडे)**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद

PDF Compressor Free Version



६. मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
७. सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
८. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
१०. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
११. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१७. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१८. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०. सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२१. सचिव,राज्य माहिती आयोग,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२३. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६. संचालक, समाजकल्याण, पुणे,
२७. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२८. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२९. संचालक, सेवायोजन, मुंबई,
३०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३१. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३४. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३५. सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३७. सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३८. निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

PDF Compressor Free Version



## परिशिष्ट-अ
## सरळसेवा भरतीसाठी १०० बिंदुनामावली

| बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ३५ | इतर मागास वर्ग | ६९ | इतर मागास वर्ग |
| २ | अनुसूचित जमाती | ३६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ७० | खुला |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३७ | अनुसूचित जाती | ७१ | अनुसूचित जमाती |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ३८ | **विशेष मागास प्रवर्ग-अ** | ७२ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| ५ | इतर मागास वर्ग | ३९ | इतर मागास वर्ग | ७३ | अनुसूचित जाती |
| ६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ४० | खुला | ७४ | खुला |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४१ | विमुक्त जाती (अ) | ७५ | इतर मागास वर्ग |
| ८ | खुला | ४२ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ७६ | **विशेष मागास प्रवर्ग-अ** |
| ९ | इतर मागास वर्ग | ४३ | अनुसूचित जाती | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| १० | खुला | ४४ | खुला | ७८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ४५ | इतर मागास वर्ग | ७९ | इतर मागास वर्ग |
| १२ | अनुसूचित जाती | ४६ | खुला | ८० | खुला |
| १३ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ४७ | भटक्या जमाती (ब) | ८१ | अनुसूचित जाती |
| १४ | खुला | ४८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ८२ | खुला |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ४९ | इतर मागास वर्ग | ८३ | विमुक्त जाती (अ) |
| १६ | **विशेष मागास प्रवर्ग-अ** | ५० | खुला | ८४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| १७ | इतर मागास वर्ग | ५१ | अनुसूचित जाती | ८५ | इतर मागास वर्ग |
| १८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ५२ | खुला | ८६ | खुला |
| १९ | इतर मागास वर्ग | ५३ | अनुसूचित जमाती | ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| २० | खुला | ५४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ८८ | खुला |
| २१ | अनुसूचित जाती | ५५ | इतर मागास वर्ग | ८९ | इतर मागास वर्ग |
| २२ | खुला | ५६ | **विशेष मागास प्रवर्ग-अ** | ९० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| २३ | अनुसूचित जमाती | ५७ | भटक्या जमाती (क) | ९१ | अनुसूचित जाती |
| २४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ५८ | खुला | ९२ | खुला |
| २५ | इतर मागास वर्ग | ५९ | इतर मागास वर्ग | ९३ | अनुसूचित जमाती |
| २६ | खुला | ६० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ९४ | **विशेष मागास प्रवर्ग-अ** |
| २७ | अनुसूचित जाती | ६१ | अनुसूचित जाती | ९५ | इतर मागास वर्ग |
| २८ | खुला | ६२ | खुला | ९६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| २९ | इतर मागास वर्ग | ६३ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| ३० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ६४ | खुला | ९८ | खुला |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ६५ | इतर मागास वर्ग | ९९ | भटक्या जमाती (ब)/(क) |
| ३२ | खुला | ६६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | १०० | खुला |
| ३३ | अनुसूचित जमाती | ६७ | अनुसूचित जाती | | |
| ३४ | खुला | ६८ | खुला | | |

PDF Compressor Free Version

शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब

## प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु

<table>
<tr><th>अनुक्रमांक</th><th>प्रवर्ग</th><th>आरक्षणाची टक्केवारी</th><th colspan="2">बिंदु क्रमांक</th></tr>
<tr><td>१</td><td>अनुसूचित जाती</td><td>१३ %</td><td colspan="2">१, १२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१, ९७</td></tr>
<tr><td>२</td><td>अनुसूचित जमाती</td><td>७ %</td><td colspan="2">२, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३</td></tr>
<tr><td>३</td><td>विमुक्त जाती (अ)</td><td>३%</td><td colspan="2">३, ४१, ८३,</td></tr>
<tr><td>४</td><td>भटक्या जमाती (ब)</td><td>२.५%</td><td>४, ४७</td><td rowspan="2">९९(ब/क)</td></tr>
<tr><td>५</td><td>भटक्या जमाती (क)</td><td>३.५%</td><td>७, ३१, ५७,</td></tr>
<tr><td>६</td><td>भटक्या जमाती (ड)</td><td>२%</td><td colspan="2">११, ७७</td></tr>
<tr><td>७</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>२%</td><td colspan="2">१५, ८७</td></tr>
<tr><td>८</td><td>इतर मागास प्रवर्ग</td><td>१९%</td><td colspan="2">५, ९, १७, १९, २५, २९, ३५, ३९, ४५, ४९, ५५, ५९, ६५, ६९, ७५, ७९, ८५, ८९, ९५</td></tr>
<tr><td>९</td><td>शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग</td><td>१६%</td><td colspan="2">६, १३, १८, २४, ३०, ३६, ४२, ४८, ५४, ६०, ६६, ७२, ७८, ८४, ९०, ९६</td></tr>
<tr><td>१०</td><td>विशेष मागास प्रवर्ग-अ</td><td>५%</td><td colspan="2">१६,३८,५६,७६,९४</td></tr>
<tr><td>११</td><td>खुला</td><td>२७%</td><td colspan="2">८,१०, १४, २०, २२, २६, २८, ३२, ३४, ४०, ४४, ४६, ५०, ५२, ५८, ६२, ६४, ६८, ७०, ७४, ८०, ८२, ८६, ८८,९२, ९८, १००</td></tr>
</table>

PDF Compressor Free Version



## परिशिष्ट-ब

### बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना.

१) सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ मधील तरतुदींस अनुसरुन सुधारित बिंदुनामावली तयार करताना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित केलेली १०० बिंदुनामावली वापरण्यात यावी.

२) बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा प्रवेश नियमातील तरतुदींनुसार संवर्गाच्या एकूण मंजूर पदसंख्येपैकी सरळसेवा कोट्यातील पदांची संख्या निश्चित करण्यात यावी.

३) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त होणारी पदे विचारात घेवून चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षांसाठी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) या प्रवर्गाकरिता आरक्षणाची गणना करतांना खाली नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

अ) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी संवर्गातील सरळसेवा कोट्यातील एकूण मंजूर पदसंख्येला (दि.९ जुलै,२०१४ पुर्वीचे अ.जा.-१३ %, अ.ज.७%, विजा-अ ३%, भ.ज.(ब)-२.५%, भ.ज.(क)-३.५%, भ.ज.(ड)-२%, विमाप्र-२% व इमाव-१९%) एकूण ५२ टक्के आरक्षण विचारात घेऊन आरक्षित पदांची गणना करावी.

आ) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी वरील आरक्षणानुसार प्रवर्ग निहाय मागास प्रवर्गाची व खुल्या प्रवर्गाची किती पदे कार्यरत आहेत, याची गणना करावी.

इ) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी संवर्गातील एकूण रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन त्यामधून दिनांक ९ जुलै, २०१४ पूर्वीच्या मागास प्रवर्गांच्या रिक्त पदांची संख्या (दि.९ जुलै,२०१४ पुर्वीचे अ.जा, अ.ज, विजा-अ , भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र व इमाव) वजा करावी.

ई) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी खुल्या प्रवर्गाची रिक्त पदे विचारात घेऊन त्यावर नव्याने आरक्षण लागू केलेल्या शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी १६% आरक्षणाची गणना करावी.

**उदा. एखाद्या संवर्गात मंजूर पदसंख्या १०० आहे. दि.९ जुलै,२०१४ पर्यंत या संवर्गात ६७ पदे कार्यरत असुन ३३ पदे रिक्त आहेत. त्या संवर्गाचा प्रवर्गनिहाय तपशील खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | प्रवर्गाचे नाव | आरक्षण टक्केवारी | आरक्षण-टक्केवारी नुसार पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे (४-५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अनु. जाती | १३ % | १३ | १० | ३ |
| २ | अनु.जमाती | ७ % | ७ | ५ | २ |
| ३ | वि.जा. (अ) | ३ % | ३ | २ | १ |
| ४ | भ.ज.(ब) | २.५ % | ३ | १ | २ |
| ५ | भ.ज.(क) | ३.५% | ३ | २ | १ |
| ६ | भ.ज.(ड) | २ % | २ | १ | १ |
| ७ | वि.मा.प्र. | २ % | २ | १ | १ |
| ८ | इ.मा.व. | १९% | १९ | १५ | ४ |
| ९ | खुला | ४८ % | ४८ | ३० | १८ |
| १० | **एकुण** | **१००%** | **१००** | ६७ | ३३ |

PDF Compressor Free Version



वरील तक्त्याचे अवलोकन केले असता ३३ रिक्त पदांपैकी खुल्या प्रवर्गाची १८ पदे रिक्त आहेत.

**A) पहिले भरती वर्ष**-अशा प्रकारे खुल्या प्रवर्गातील एकूण रिक्त पदांच्या १६ % प्रमाणे येणारी पदे ही नव्याने आरक्षण लागू केलेल्या शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित असतील. म्हणजेच १८ च्या १६ %=२.८८ म्हणजेच पूर्णांकात एकूण ३ पदे शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी पहिल्या भरतीवर्षासाठी आरक्षित असतील.

**B) दुसरे भरती वर्ष**-दुस-या भरती वर्षात, खुल्या प्रवर्गात २० रिक्त पदे उपलब्ध झाली असे समजल्यास, दुस-या भरती वर्षी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी रिक्ततेची गणना करतांना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत मागील भरतीवर्षामधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळवून (म्हणजेच २०+१८=३८) येणाऱ्या एकूण रिक्त ३८ पदांच्या १६% प्रमाणे येणारी पदे ६.०८ म्हणजेच पूर्णांकांत ६ पदे, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षीत राहतील. असे करत असताना, मागील भरतीवर्षी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थितीत कार्यरत पदे वजा करून उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित ३ पदांपैकी २ पदे भरली असतील व सद्यस्थितीत सदरची २ पदे कार्यरत असतील तर दुस-या भरती वर्षासाठी आरक्षित ६ पदांपैकी ४ पदांची (६-२) भरती करावी.

**C) तिसरे भरती वर्ष**-त्यानंतरच्या तिस-या भरती वर्षात ३२ पदे रिक्त झाली असे समजल्यास, तिस-या भरती वर्षी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी रिक्ततेची गणना करतांना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत मागील भरतीवर्षामधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळवून (म्हणजेच ३२+२०+१८=७०) येणाऱ्या एकूण ७० रिक्त पदांच्या १६% प्रमाणे येणारी पदे ११.२ म्हणजेच पूर्णांकात ११ पदे शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षीत राहतील. असे करत असताना, मागील भरतीवर्षी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थितीत कार्यरत पदे वजा करून उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षाअखेर शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित ६ पदांपैकी ५ पदे भरली असतील व सद्यस्थितीत सदरची ५ पदे कार्यरत असतील तर तिस-या भरती वर्षासाठी आरक्षित ११ पदांपैकी ६ पदांची (११-५) भरती करावी.

**D) चौथे भरती वर्ष**- त्यानंतरच्या चौथ्या भरती वर्षात ३० पदे रिक्त झाली असे असे समजल्यास, चौथ्या भरती वर्षी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी रिक्ततेची गणना करतांना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत मागील भरतीवर्षामधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळवून (म्हणजेच ३०+३२+२०+१८=१००) येणाऱ्या एकूण रिक्त १०० पदांच्या १६% प्रमाणे येणारी पूर्णांकात १६ पदे शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित राहतील. असे करत असताना, मागील भरतीवर्षामध्ये शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थितीत कार्यरत पदे वजा करून उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षाअखेर शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित ११ पदांपैकी ११ पदे भरली असतील व सद्यस्थितीत सदरची ११ पदे कार्यरत असतील तर चौथ्या भरती वर्षासाठी आरक्षित १६ पदांपैकी ५ पदांची (१६-११) भरती करावी.

४) वरील प्रमाणे आरक्षण गणनेची कार्यवाही जो पर्यंत शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी अनुज्ञेय १६ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे उपलब्ध होत नाहीत, तो पर्यंत चालू ठेवावी. शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी १६ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे प्राप्त झाल्यानंतर मात्र प्रत्येक प्रवर्गनिहाय अनुज्ञेय टक्केवारीनुसार त्या-त्या प्रवर्गाची पदे भरण्यात यावीत.

PDF Compressor Free Version



पद भरती केलेल्या शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गातील उमेदवारांची बिंदुनामावलीत बिंदु क्रमांक ६ पासून नोंद प्रारंभ करून यानुसार त्यापुढे सदर प्रवर्गासाठीच्या बिंदुवर नोंद करावी.

५) सुधारित बिंदुनामावली तयार करताना सध्या असलेली संवर्गातील सरळसेवा कोटयातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, संबंधित वर्षाची बिंदुनामावली तयार करताना सरळसेवा कोट्यातील पदसंख्येनुसार आरक्षित बिंदुची संख्या त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

६) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी ,त्यांच्या अधिनस्त सर्व आस्थापनांना वरील विविध संवर्गाच्याबाबतीत यानुसार योग्य ती कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना द्याव्यात.प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व योग्य त्या प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली आहे याची खातरजमा करण्यात यावी.

७) सध्या आरक्षणासंदर्भात अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरील प्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहित धरण्यात यावे.

************

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक १६/२०१४

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ४१३४
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :- ०६ सप्टेंबर,२०१४

महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय पुणे
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
विभाग नियंत्रक,
म.रा.मा.प.महामंडळ,
मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदूर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/
जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/
गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - विशेष मागास प्रवर्ग -अ (एसबीसी-ए)करिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.

संदर्भ - १)कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १२ /२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१२१ दिनांक ०५ सप्टेंबर,२०१४
२)कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १४ /२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१२३ दिनांक ०५ सप्टेंबर,२०१४
३)कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १५/१९९७
क्र.राप/आस्था/माजा-२/२८०४ दिनांक २०.०५.१९९७

*****

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब दिनांक २४ जुलै,२०१४ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन निर्णयाची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

**सोबत : वरीलप्रमाणे**

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत सादर रवाना :-**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ उप महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिक /मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/समन्वय)/(घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन/प्रशासन) यांचे माहितीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

**सोबत : वरीलप्रमाणे**

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

PDF Compressor Free Version

विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) करिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**शासन निर्णय क्रमांक बीसीसी -२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४ /१६-ब**

**दिनांक : २४ जुलै, २०१४.**

**वाचा:-**

१. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४ व या अध्यादेशाबाबत दि.१४ जुलै, २०१४ चे शुद्धिपत्र.

२. शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अविवि२०१४/प्र.क्र.८१/का-७, दि.१९ जुलै,२०१४.

३. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१.

४. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७.

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए)करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश,२०१४ **(सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१४)** अन्वये **"विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए)"** निर्माण करण्यात आला आहे,सदर अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार या प्रवर्गास सरळसेवेच्या पदभरतीमध्ये ५ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

उक्त अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार व अल्पसंख्याक विकास विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी ५ टक्के आरक्षणास अनुसरून, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या

PDF Compressor Free Version



बिंदुनामावलीमध्ये सरळसेवा भरतीच्या पदासंदर्भात उक्त अध्यादेशातील कलम ८ (१) नुसार सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे. :-

**शासन निर्णय :-** विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) करिता संदर्भाधीन क्रमांक १ येथील अध्यादेशानुसार ५ टक्के आरक्षण लागू करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ येथील अल्पसंख्याक विकास विभागाच्या दिनांक १९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयान्वये, राज्यात सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समाजासाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम १५(४), १५(५), १६(४) व ४६ मधील तरतुदींनुसार विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) असा नवीन प्रवर्ग तयार करण्यात आल्याचे व या प्रवर्गात सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटाचा (सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ मधील अनुसूचीप्रमाणे व अल्पसंख्याक विकास विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयासोबतच्या अनुसूचितील यादीप्रमाणे) समावेश करण्यात आल्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्याअनुषंगाने विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) प्रवर्गासाठी, राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय / निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये ५ टक्के आरक्षण विहित करण्यात येत आहे. त्यानुसार शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब दि.२९.३.१९९७ अन्वये विहित करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारित करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ९ जुलै, २०१४ चा अध्यादेश प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसंदर्भात सोबतच्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित करण्यात येत असलेल्या सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करण्यात यावा.

३. गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) प्रवर्गातील कर्मचा-यांची संबंधित प्रवर्गाच्या आरक्षित पदावर गणना करण्यात येऊ नये. त्यांची नियुक्ती संबंधित आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्यांची नोंद खुल्या प्रवर्गातील बिंदुवर दर्शविण्यात यावी.

PDF Compressor Free Version



४. विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी सरळसेवेने भरण्यात येणारी ५ टक्के आरक्षणाची पदे दिनांक ९ जुलै, २०१४ पासून भरणे आवश्यक आहे. त्यामुळे संवर्गामध्ये दिनांक ९ जुलै २०१४ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त होणारी पदे विचारात घेवून चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षाकरिता विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) या करिता आरक्षणाची गणना करतांना सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

५. संदर्भीय सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ मधील कलम १८ (१) व सदर अध्यादेशातील कलम १८(२) बाबत दि.१४ जुलै, २०१४ रोजीच्या शुद्धिपत्रानुसार, या अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी म्हणजेच दिनांक ९ जुलै, २०१४ पूर्वीच सरळसेवा भरतीमधील निवड प्रक्रिया सुरू झाली असेल, अशा प्रकरणांना या अध्यादेशाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. अशा प्रकरणांच्या बाबतीत, सदर अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि आरक्षण अधिनियम,२००१ मधील ज्या तरतुदी लागू होत्या, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. दि.९ जुलै, २०१४ पूर्वी ज्या प्रकरणी सरळसेवा भरतीच्या प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झालेली आहे, त्याचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही. यापुढे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सरळसेवा भरतीसाठी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** नुसार सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करावा. पूर्वीपासून आरक्षण लागू असलेल्या मागासप्रवर्गांचा अनुशेष असल्यास तो सरळसेवा भरतीच्यावेळी विचारात घेण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्त्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

PDF Compressor Free Version



८. सरळसेवेव्दारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत, वरील प्रमाणे बिंदुनामावलीचा अवलंब करताना, सोबत जोडलेल्या **परिशिष्ट–ब** मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

हे आदेश दिनांक ९ जुलै, २०१४ पासून अंमलात येतील.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१४०७२४१७२६५८६००७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( प्रमोद त्र्यं. नलावडे )**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
६. मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
७. सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
८. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
१०. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
११. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१७. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१८. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

PDF Compressor Free Version



२०. सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२१. सचिव,राज्य माहिती आयोग,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२३. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६. संचालक, समाजकल्याण, पुणे,
२७. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२८. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२९. संचालक, सेवायोजन, मुंबई,
३०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३१. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३४. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३५. सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३७. सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३८. निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********

PDF Compressor Free Version



**परिशिष्ट-अ सरळसेवा भरतीसाठी १०० बिंदुनामावली**

| बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग | बिंदु क्र | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ३५ | इतर मागास वर्ग | ६९ | इतर मागास वर्ग |
| २ | अनुसूचित जमाती | ३६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ७० | खुला |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३७ | अनुसूचित जाती | ७१ | अनुसूचित जमाती |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ३८ | **विशेष मागास प्रवर्ग-अ** | ७२ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| ५ | इतर मागास वर्ग | ३९ | इतर मागास वर्ग | ७३ | अनुसूचित जाती |
| ६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ४० | खुला | ७४ | खुला |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४१ | विमुक्त जाती (अ) | ७५ | इतर मागास वर्ग |
| ८ | खुला | ४२ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ७६ | **विशेष मागास प्रवर्ग-अ** |
| ९ | इतर मागास वर्ग | ४३ | अनुसूचित जाती | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| १० | खुला | ४४ | खुला | ७८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ४५ | इतर मागास वर्ग | ७९ | इतर मागास वर्ग |
| १२ | अनुसूचित जाती | ४६ | खुला | ८० | खुला |
| १३ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ४७ | भटक्या जमाती (ब) | ८१ | अनुसूचित जाती |
| १४ | खुला | ४८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ८२ | खुला |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ४९ | इतर मागास वर्ग | ८३ | विमुक्त जाती (अ) |
| १६ | **विशेष मागास प्रवर्ग-अ** | ५० | खुला | ८४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| १७ | इतर मागास वर्ग | ५१ | अनुसूचित जाती | ८५ | इतर मागास वर्ग |
| १८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ५२ | खुला | ८६ | खुला |
| १९ | इतर मागास वर्ग | ५३ | अनुसूचित जमाती | ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| २० | खुला | ५४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ८८ | खुला |
| २१ | अनुसूचित जाती | ५५ | इतर मागास वर्ग | ८९ | इतर मागास वर्ग |
| २२ | खुला | ५६ | **विशेष मागास प्रवर्ग-अ** | ९० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| २३ | अनुसूचित जमाती | ५७ | भटक्या जमाती (क) | ९१ | अनुसूचित जाती |
| २४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ५८ | खुला | ९२ | खुला |
| २५ | इतर मागास वर्ग | ५९ | इतर मागास वर्ग | ९३ | अनुसूचित जमाती |
| २६ | खुला | ६० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ९४ | **विशेष मागास प्रवर्ग-अ** |
| २७ | अनुसूचित जाती | ६१ | अनुसूचित जाती | ९५ | इतर मागास वर्ग |
| २८ | खुला | ६२ | खुला | ९६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| २९ | इतर मागास वर्ग | ६३ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| ३० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ६४ | खुला | ९८ | खुला |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ६५ | इतर मागास वर्ग | ९९ | भटक्या जमाती (ब)/(क) |
| ३२ | खुला | ६६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | १०० | खुला |
| ३३ | अनुसूचित जमाती | ६७ | अनुसूचित जाती | | |
| ३४ | खुला | ६८ | खुला | | |

PDF Compressor Free Version



## सरळसेवा भरतीसाठी १०० बिंदुनामावली

### प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु

<table>
<tr><th>अनुक्रमांक</th><th>प्रवर्ग</th><th>आरक्षणाची टक्केवारी</th><th colspan="2">बिंदु क्रमांक</th></tr>
<tr><td>१</td><td>अनुसूचित जाती</td><td>१३ %</td><td colspan="2">१, १२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१, ९७</td></tr>
<tr><td>२</td><td>अनुसूचित जमाती</td><td>७ %</td><td colspan="2">२, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३</td></tr>
<tr><td>३</td><td>विमुक्त जाती (अ)</td><td>३%</td><td colspan="2">३, ४१, ८३,</td></tr>
<tr><td>४</td><td>भटक्या जमाती (ब)</td><td>२.५%</td><td>४, ४७</td><td rowspan="2">९९(ब/क)</td></tr>
<tr><td>५</td><td>भटक्या जमाती (क)</td><td>३.५%</td><td>७, ३१, ५७,</td></tr>
<tr><td>६</td><td>भटक्या जमाती (ड)</td><td>२%</td><td colspan="2">११, ७७</td></tr>
<tr><td>७</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>२%</td><td colspan="2">१५, ८७</td></tr>
<tr><td>८</td><td>इतर मागास प्रवर्ग</td><td>१९%</td><td colspan="2">५, ९, १७, १९, २५, २९, ३५, ३९, ४५, ४९, ५५, ५९, ६५, ६९, ७५, ७९, ८५, ८९, ९५</td></tr>
<tr><td>९</td><td>शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग</td><td>१६%</td><td colspan="2">६, १३, १८, २४, ३०, ३६, ४२, ४८, ५४, ६०, ६६, ७२, ७८, ८४, ९०, ९६</td></tr>
<tr><td>१०</td><td>विशेष मागास प्रवर्ग-अ</td><td>५%</td><td colspan="2">१६,३८,५६,७६,९४</td></tr>
<tr><td>११</td><td>खुला</td><td>२७%</td><td colspan="2">८,१०, १४, २०, २२, २६, २८, ३२, ३४, ४०, ४४, ४६, ५०, ५२, ५८, ६२, ६४, ६८, ७०, ७४, ८०, ८२, ८६, ८८,९२, ९८, १००</td></tr>
</table>

PDF Compressor Free Version



## परिशिष्ट-ब

### बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना.

१) सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ मधील तरतुदींस अनुसरुन सुधारित बिंदुनामावली तयार करताना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित केलेली १०० बिंदुनामावली वापरण्यात यावी.

२) बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा प्रवेश नियमातील तरतुदींनुसार संवर्गाच्या एकूण मंजूर पदसंख्येपैकी सरळसेवा कोट्यातील पदांची संख्या निश्चित करण्यात यावी.

३) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त होणारी पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षांसाठी विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) या करिता आरक्षणाची गणना करतांना खाली नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

**अ)** दिनांक ९ जुलै २०१४ रोजी संवर्गातील सरळसेवा कोट्यातील एकूण मंजूर पदसंख्येला (दि.९ जुलै,२०१४ पुर्वीचे अ.जा.-१३ %, अ.ज.७%, विजा-अ ३%, भ.ज.(ब)-२.५%, भ.ज.(क)-३.५%, भ.ज.(ड)-२%, विमाप्र-२% व इमाव-१९%) एकूण ५२ टक्के आरक्षण विचारात घेऊन आरक्षित पदांची गणना करावी.

**आ)** दिनांक ९ जुलै २०१४ रोजी वरील आरक्षणानुसार प्रवर्ग निहाय मागास प्रवर्गाची व खुल्या प्रवर्गाची किती पदे कार्यरत आहेत, याची गणना करावी.

**इ)** दिनांक ९ जुलै २०१४ रोजी संवर्गातील एकूण रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन त्यामधून दिनांक ९ जुलै, २०१४ पूर्वीच्या मागास प्रवर्गाच्या रिक्त पदांची संख्या (दि.९ जुलै,२०१४ पुर्वीचे अ.जा, अ.ज, विजा-अ , भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र व इमाव) वजा करावी.

**ई)** दिनांक ९ जुलै २०१४ रोजी खुल्या प्रवर्गाची रिक्त पदे विचारात घेऊन त्यावर नव्याने आरक्षण लागू केलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी ५% आरक्षणाची गणना करावी.

**उदा. एखाद्या संवर्गात मंजूर पद संख्या १०० आहे. दि.९ जुलै,२०१४ पर्यंत या संवर्गात ६७ पदे कार्यरत असुन ३३ पदे रिक्त आहेत. त्या संवर्गाचा प्रवर्गनिहाय तपशील खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | प्रवर्गाचे नाव | आरक्षण टक्केवारी | आरक्षण-टक्केवारी नुसार पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे (४-५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अनु. जाती | १३% | १३ | १० | ३ |
| २ | अनु.जमाती | ७% | ७ | ५ | २ |
| ३ | वि.जा. (अ) | ३% | ३ | २ | १ |
| ४ | भ.ज.(ब) | २.५% | ३ | १ | २ |
| ५ | भ.ज.(क) | ३.५% | ३ | २ | १ |
| ६ | भ.ज.(ड) | २% | २ | १ | १ |
| ७ | वि.मा.प्र. | २% | २ | १ | १ |
| ८ | इ.मा.व. | १९% | १९ | १५ | ४ |
| ९ | खुला | ४८% | ४८ | ३० | १८ |
| १० | **एकूण** | **१००%** | **१००** | ६७ | ३३ |

PDF Compressor Free Version



वरील तक्त्याचे अवलोकन केले असता ३३ रिक्त पदांपैकी खुल्या प्रवर्गाची १८ पदे रिक्त आहेत.

**A) पहिले भरती वर्ष**-अशा प्रकारे खुल्या प्रवर्गातील एकूण रिक्त पदांच्या ५% प्रमाणे येणारी पदे ही नव्याने आरक्षण लागू केलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी आरक्षित असतील. म्हणजेच १८ च्या ५ %=०.९० म्हणजेच पूर्णांकात एकूण १ पद विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी पहिल्या भरतीवर्षासाठी आरक्षित असेल.

**B) दुसरे भरती वर्ष**-दुस-या भरती वर्षात, खुल्या प्रवर्गात २० रिक्त पदे उपलब्ध झाली असे समजल्यास, दुस-या भरती वर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी रिक्ततेची गणना करतांना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदाच्या संख्येत मागील भरतीवर्षामधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळवून (म्हणजेच २०+१८=३८) येणाऱ्या एकूण ३८ रिक्त पदांच्या ५% प्रमाणे येणारी पदे १.९ म्हणजेच पूर्णांकात २ पदे विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी आरक्षित राहतील. असे करत असताना, मागील भरतीवर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थितीत कार्यरत पदे वजा करून उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी आरक्षित १ पदापैकी १ पद भरले असेल व सद्यस्थितीत सदरचे १ पद कार्यरत असेल तर दुस-या भरती वर्षासाठी आरक्षित २ पदांपैकी १ पदाची (२-१) भरती करावी.

**C) तिसरे भरती वर्ष**-त्यानंतरच्या तिस-या भरती वर्षात ३२ पदे रिक्त झाली असे समजल्यास, तिस-या भरती वर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी रिक्ततेची गणना करतांना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत मागील भरतीवर्षामधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळवून (म्हणजेच ३२+२०+१८=७०) येणाऱ्या एकूण ७० रिक्त पदांच्या ५ % प्रमाणे येणारी पदे ३.५ म्हणजेच पूर्णांकात ४ पदे विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी आरक्षित राहतील. असे करत असताना, मागील भरतीवर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थितीत कार्यरत पदे वजा करून उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षाअखेर विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी आरक्षित २ पदांपैकी १ पद भरले असेल व सद्यस्थितीत सदरचे १ पद कार्यरत असेल तर तिस-या भरती वर्षासाठी आरक्षित ४ पदांपैकी ३ पदांची (४-१) भरती करावी.

**D) चौथे भरती वर्ष**- त्यानंतरच्या चौथ्या भरती वर्षात ३० पदे रिक्त झाली असे असे समजल्यास, चौथ्या भरती वर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी रिक्ततेची गणना करतांना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत मागील भरतीवर्षामधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळवून (म्हणजेच ३०+३२+२०+१८=१००) येणाऱ्या एकूण १०० रिक्त पदांच्या ५% प्रमाणे येणारी पूर्णांकात ५ पदे विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी आरक्षित राहतील. असे करत असताना, मागील भरतीवर्षामध्ये विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थितीत कार्यरत पदे वजा करून उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षा अखेर विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी आरक्षित ४ पदांपैकी ४ पदे भरली असतील व सद्यस्थितीत सदरची ४ पदे कार्यरत असतील तर चौथ्या भरती वर्षासाठी आरक्षित ४ पदांपैकी १ पदाची (५-४) भरती करावी.

४) वरील प्रमाणे आरक्षण गणनेची कार्यवाही जो पर्यंत विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी अनुज्ञेय ५ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे उपलब्ध होत नाहीत, तो पर्यंत चालू ठेवावी. विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) साठी ५ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे प्राप्त झाल्यानंतर मात्र प्रत्येक प्रवर्गनिहाय अनुज्ञेय टक्केवारीनुसार त्या-त्या प्रवर्गाची पदे भरण्यात यावीत.

पद भरती केलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए) प्रवर्गातील उमेदवारांची बिंदुनामावलीत बिंदु क्रमांक १६ पासून नोंद प्रारंभ करून यानुसार त्यापुढे सदर प्रवर्गासाठीच्या बिंदुवर नोंद करावी.

PDF Compressor Free Version



५) सुधारित बिंदुनामावली तयार करताना सध्या असलेली संवर्गातील सरळसेवा कोटयातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, संबंधित वर्षाची बिंदुनामावली तयार करताना सरळसेवा कोट्यातील पदसंख्येनुसार आरक्षित बिंदुंची संख्या त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

६) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी ,त्यांच्या अधिनस्त सर्व आस्थापनांना वरील विविध संवर्गाच्याबाबतीत यानुसार योग्य ती कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना द्याव्यात. प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व योग्य त्या प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली आहे याची खातरजमा करण्यात यावी.

७) सध्या आरक्षणासंदर्भात अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरील प्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहित धरण्यात यावे.

************

PDF Compressor Free Version

६५१

कर्मचारीवर्ग खाते.
परिपत्रक क्रमांक १७ /२०१४

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ ४२८८
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव ना. मार्ग,
मुंबई ४०० ००८.
दिनांक १५ सप्टेंबर, २०१४.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई /पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  भांडार विभाग (कुर्ला) / मुंबई / पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदूर्ग / ठाणे / नाशिक / जळगांव /धुळे/ अहमदनगर / पुणे / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर / औरंगाबाद / बीड / जालना / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी / नागपूर / भंडारा / चंद्रपूर / वर्धा / अमरावती /अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय : रा.प. महामंडळातील अंध, अस्थी व्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असलेल्या कर्मचा-यांना वाहतूक भत्ता अदा करणेबाबत.**

**संदर्भ :** १) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/ १९८१
क्र. एसटी/ इएसटी/४४१-ई/ ९७९० दिनांक ०१.१२.१९८१.
२) क्र. एसटी/ इएसटी/४४१-ई/ ५९३७ दिनांक ०६.०८.१९८३.
३) क्र. एसटी/ इएसटी/४४१-ई/ ५२२३ दिनांक ११.०८.१९८९.
४) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १२/ २००१
क्र. राप/आस्था/ ४०८-ई/ ९०८ दिनांक १४.०२.२००१.
५) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक २/ २००२
क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/जीएडी/ ४४ दिनांक ०३.०२.२००२
६) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ४/ २००५
क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/जीएडी/२१६ दिनांक १५.०१.२००५.
७) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक २/ २०११
क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/३०२ दिनांक १७.०१.२०११
८) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १५/ २०१२
क्र.राप/कर्मवर्ग/४०८-ई(१)/४९८६दिनांक १२.०९.२०१२

*****

संदर्भित परिपत्रकान्वये राज्य परिवहन महामंडळातील अंध, अस्थी व्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असलेले कर्मचा-यांना शासन धर्तीवर सुधारीत दराने वाहतूक भत्ता अदा करण्याबाबतच्या सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत.

आता शासनाने शासन निर्णय क्रमांक वाहभ -२०१४/प्र.क्र.५/सेवा-५ दिनांक ३ जून २०१४ अन्वये दिनांक ०१.०४.२०१४ पासून वाहतूक भत्त्याच्या दरात वाढ केलेली आहे. संदर्भित परिपत्रकात दर्शविलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता होत असल्यास, राज्य परिवहन महामंडळातील तृतीय व चतुर्थ वर्ग कर्मचा-यांना दिनांक ०१.०४.२०१४ पासून वाहतूक भत्ता अदा करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. राज्य परिवहन महामंडळातील अंध, अस्थी व्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असलेले कर्मचा-यांना शासन धर्तीवर वाहतूक भत्याचे सुधारीत दर पुढील तक्त्यात दर्शविले आहेत.

-२-

PDF Compressor Free Version



**तक्ता**

| अ. क्र. | कर्मचा-याची वेतन श्रेणी | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर रुपये | |
|---|---|---|---|
| | | "अ १" ते "अ" वर्ग शहरे. | इतर ठिकाणे. |
| १ | रुपये १७४००/- किंवा त्याहून अधिक | ४८०० | २४०० |
| २ | रुपये ७८३०/-पेक्षा जास्त व १७३९९ पेक्षा कमी. | २४०० | २००० |
| ३ | रुपये ७८३०/- व त्यापेक्षा कमी. | २००० | २००० |

वरील तक्त्यात नमुद केलेली "अ-१" आणि "अ" शहरे स्थानिक पूरक भत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या शहरांच्या वर्गीकरणाप्रमाणे राहतील. (शासन निर्णय क्रमांक वाहभ-१०९८/ प्र.क्र.८३/९८/सेवा-५ दिनांक १४.१२.१९९८, क्रमांक : संकिर्ण - १००९/प्र.क्र.४०/सेवा -५ दिनांक १३.०५.२००९ व क्रमांक : घभाभ -१००९/प्र.क्र. ६७/सेवा-५ दिनांक २४ ऑगस्ट, २००९.)

अपंगत्वासंबंधी विहित करण्यात आलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वाहतूक भत्ता दि.०१.०४.२०१४ पासून अनुज्ञेय राहील .

१. कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांचा एकत्र परिसरात ( Campus),रा.प.निवासस्थान असलेल्या कर्मचा-यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.
२. ज्या कर्मचा-यांना महामंडळाने वाहतूक सुविधा पुरविली आहे त्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय असणार नाही
३. रजा, प्रशिक्षण, दौरा इत्यादी कारणांमुळे ३० दिवसांपेक्षा जास्त अनुपस्थितीच्या कालावधीसाठी वाहतूक भत्ता अज्ञेय असणार नाही.

शासनाने शासकीय कर्मचा-यांना व इतराना वाहतूक भत्ता मंजूर करण्याबाबत शासन परिपत्रक क्रमांक : वाहभ -१०९९/प्र.क्र. ४५/सेवा - ५ दिनांक ०९.०५.२००३ अन्वये स्पष्टीकरणात्मक सूचना प्रसारीत केल्या आहेत, त्या सुचनांची शासन परिपत्रकाची प्रत संदर्भित पत्र क्र.७ अन्वये यापूर्वी माहितीसाठी जोडली आहे. त्या नुसार त्या सुचनेअधिन यथोचित कार्यवाही करण्यात यावी. तसेच वाहतूक भत्ताच्या दरा व्यतिरिक्त इतर विद्यमान तरतूदी व कार्यपध्दती आहे त्याचप्रकारे यापुढे लागू राहतील.

सदरहू परिपत्रक लेखा खात्याचे सहमतीने प्रसारीत करण्यात आले आहे. कृपया परिपत्रकाची पोच द्यावी.

**सोबत : वरीलप्रमाणे.** **महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :-**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /
महाव्यवस्थापक ( भां. व ख.) /महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (यं.अ)/
महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/उपमहाव्यवस्थापक(संगणित्र माहिती व तंत्रज्ञान) /उप महाव्यवस्थापक (विधि)/
मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /
जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक /
मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) /
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तीक सचिव /अध्यक्षांचे वैयक्तीक सचिव /
मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी ( मुख्यालय)/(युआर) /(मावक)/(समन्वय)/(परीक्षाकक्ष)/(मनुष्यबळ)/(प्रशासन)/ ( राज्य संवर्ग).....

**सोबत: वरीलप्रमाणे.** **महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) करीता.**

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक ९८ /२०१४

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ४८९६
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :- ९३ ऑक्टोबर ,२०१४

महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय पुणे
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
विभाग नियंत्रक,
म.रा.मा.प.महामंडळ,
मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदूर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/
जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/
गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यान्वित करण्याबाबतच्या कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शनार्थ स्पष्टीकरण ---
संदर्भ - कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१७/१९९९
क्र.राप/आस्था/माज्रा-२/३१५७ दिनांक १८ मे,१९९९

*****

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही १०१२/ प्र.क्र.१६/१२/१६-अ दिनांक १३ ऑगस्ट,२०१४ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

सोबत :- वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत सादर रवाना :-

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिक /मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/समन्वय)/(घटकसंवर्ग)/(प्रशासन) यांचे माहितीसाठी.उपरोक्त शासन परिपत्रकाची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (रोजमंडळ) /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन परिपत्रकाची प्रत यासोबत जोडली आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

PDF Compressor Free Version

**शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यान्वित करण्याबाबतच्या कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शनार्थ स्पष्टीकरण..**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

तारीख: १३ ऑगस्ट, २०१४.

**वाचा :-** शासन परिपत्रक क्रमांकः एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च,१९९९.

**प्रस्तावना :-**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०९७/प्र.क्र.३१/ ९८/१६-अ, दिनांक १६ मार्च, १९९९ नुसार शासन सेवेत सरळसेवेने नियुक्ती करताना समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

२. अ) श्री.इरफान मुस्तफा शेख यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्रमांक ३०१/२००९ मध्ये मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिनांक २६.८.२००९ रोजी दिलेला न्यायनिर्णय, याबाबत करण्यात आलेल्या अपिलावर (रिट याचिका क्रमांक २७२/२०१०) मध्ये मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिनांक १५.११.२०१० रोजी दिलेला न्यायनिर्णय आणि मा.सर्वोच्च न्यायालयाने याबाबतच्या अपिलावर (एसएलपी/सिव्हील सी.सी.१५८०२/२०११) दिनांक २७.९.२०११ रोजी दिलेला न्यायनिर्णय.

ब) त्याचप्रमाणे मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल करण्यात आलेला श्रीमती किर्ती वाघ यांचा मूळ अर्ज क्रमांक ९२४/२०१० मधील दिनांक ११.४.२०११ च्या निर्णयासंदर्भात दाखल झालेल्या पुनर्विलोकन अर्ज क्रमांक ४/२०१२ मध्ये मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिनांक १७.६.२०१३ रोजी दिलेला न्यायनिर्णय.

क) तसेच कु.अर्चना शिवाजी खांबे व इतर यांचा मूळ अर्ज क्रमांक ४३७/२०१२ मध्ये दिनांक २.४.२०१४ रोजी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिलेला न्यायनिर्णय.

PDF Compressor Free Version



३. उपरोक्त सर्व न्यायनिर्णय विचारात घेता, शासन परिपत्रक दिनांक १६ मार्च, १९९९ मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीसंदर्भात मार्गदर्शनार्थ स्पष्टीकरण निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार आता खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत:-

**शासन परिपत्रक :-**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च, १९९९ मधील परिच्छेद ५ मध्ये विहित करण्यांत आलेल्या कार्यपध्दतीमध्ये मार्गदर्शनार्थ स्पष्टीकरणाचा समावेश करण्यांत येत असून सुधारित परि.५ खालीलप्रमाणे आहे. शासन सेवेत सरळसेवेने नियुक्ती करताना समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी सदर सुधारित कार्यपध्दती अनुसरण्यात यावी :-

(अ) प्रथम टप्पा :- खुल्या प्रवर्गातून समांतर आरक्षणाची पदे भरताना, गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी (या ठिकाणी खुल्या प्रवर्गात गुणवत्तेच्या आधारावर मागासवर्गीय उमेदवारांचाही समावेश होईल). या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्भवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर खुल्या प्रवर्गासाठी राखीव समांतर आरक्षणाची पदे भरण्याकरिता सदर यादीतील आवश्यक पर्याप्त संख्येइतके शेवटचे उमेदवार वगळून पात्र उमेदवारांपैकी केवळ खुल्या प्रवर्गाचेच आवश्यक पर्याप्त संख्येइतके उमेदवार घेणे आवश्यक आहे."

(ब) दुसरा टप्पा :- त्यानंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार कराव्यात. (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा "अ" मध्ये सामील झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे.)

(क) तिसरा टप्पा :- वरील "ब" नुसार तयार करण्यात आलेल्या याद्यांमध्ये सामाजिक आरक्षणातील (Social Reservation) प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार "अ" येथे विशद केलेल्या कार्यपध्दतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गांतर्गत रहावे.

PDF Compressor Free Version



सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१४०८१३१०५३२०४३०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(प्रमोद त्र्यं.नलावडे)**

**सचिव (सा.वि.स.),सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई-३२.

२) सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.

३) मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल, राजभवन, मुंबई-४०० ०३५.

४) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

५) मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

६) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

७) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

८) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.

९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.

१०) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.

११) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.

१२) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.

१३) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.

१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.

PDF Compressor Free Version



१५) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.

१६) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.

१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

१८) सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी.

१९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र-१, मुंबई.

२०) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र-२, नागपूर.

२१) सरकारी वकील, उच्च न्यायालय, मूळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.

२२) सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.

२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)

**त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.**

२४) ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),

२५) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.

२६) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका.

२७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

२८) राज्यातील सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.

२९) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य.

३०) निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

---

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.१८/२०१४

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ४८९४
म.रा.मा.प.महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांकः ९/ ऑक्टोबर, २०१४.

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय : चालकांची दृष्टी तिक्ष्णता चाचणी विभागीय पातळीवर करुन घेण्याबाबत.
संदर्भः कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.०८/१९९८
(क्र.राप/आस्था/४०८-ई/२५५९ दि.०५ मे,१९९८)

---------

रा.प.कर्मचा-यांसाठी महामंडळाने शारिरीक पात्रतेसंबंधी जे विनियम तयार केलेले आहेत,त्यातील अनु.क्र.७(१)(अ) मध्ये चालक पदातील कर्मचा-यांना त्यांची कर्तव्ये सुरक्षिततेने पार पाडणे सातत्याने शक्य व्हावे यासाठी चालकांची त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या तारखेपासून त्यांचे वय चाळीस वर्षाचे होईपर्यंत प्रत्येक दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर डोळयांची तपासणी तसेच ४० वर्षे पुर्ण झाल्यानंतर त्यांची निवृत्तीच्या वयापर्यंत म्हणजेच त्यांच्या वयाच्या ५८ वर्षांपर्यंत दरवर्षी दृष्टी तिक्ष्णता तपासणी विभागीय पातळीवर करण्याबाबत सुचना संदर्भित परिपत्रकामध्ये दिलेल्या आहेत.

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, संदर्भित परिपत्रकामध्ये सुचना देऊनही काही विभागांमध्ये चालकाच्या दृष्टी तिक्ष्णता चाचणी करणेबाबत योग्य ती मोहिम राबविली जात नाही. परिणामी, चालक दृष्टी तिक्ष्णता चाचणीविना कामगिरी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी पुन्हा एकदा आपणास कळविण्यात येते की, रा.प.बस मधून प्रवास करणा-या प्रवाशांचा प्रवास सुरक्षित होण्याच्या दृष्टीने चालकाची फार मोठी भूमिका आहे. त्याकरिता चालक चालकाची कामगिरी करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता चालकाच्या दृष्टी तिक्ष्णता चाचणी करुन घेण्याबाबत आपल्या विभागात कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात येत आहे,याबाबतची सविस्तर माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये या कार्यालयास पाठविण्यात यावी.

तसेच संदर्भित परिपत्रकान्वये विभागीय पातळीवर चालकांची नेत्र तपासणी चाचणी करुन घेण्याच्या सुचना प्रसारीत केलेल्या आहेत. तथापि दृष्टी तिक्ष्णता चाचणी घेण्यासाठी नेत्र चिकीत्सक किमान शैक्षणिक पात्रता असलेले तालुका पातळीवर खाजगी डॉक्टर उपलब्ध असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आलेले आहे. तरी आपणास कळविण्यात येते की, यापुढे चालकांची नेत्र तपासणी तालुका पातळीवर करण्यासाठी नेत्रतज्ञ निवड करण्याचा प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा. जेणेकरुन अशा प्रकारच्या नेमणूकीस या कार्यालयाकडून मान्यता देण्यात येईल.

तरी आपण करीत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सोबतः प्रपत्र.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

PDF Compressor Free Version

## प्रपत्र -१

**चालकांची त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या तारखेपासुन त्यांचे वय ४० वर्षे होईपर्यंत प्रत्येक २ वर्षांचा कालावधी संपल्यानंतर करावयाची दृष्टी तिक्षणता चाचणी.**

विभाग :

| विभागामध्ये ४० वर्षे वयापर्यंतचे असलेले एकूण चालक | दृष्टी तिक्षणता चाचणीमध्ये पात्र झालेल्या चालकांची संख्या | दृष्टी तिक्षणता चाचणी प्रत्येकी २ वर्षांमध्ये करण्यात आलेल्या चालकांची संख्या. | दृष्टी तिक्षणता चाचणी करण्याचे बाकी असलेल्या चालकांची संख्या (२-३) | अनु.क्र.४ मधील चालकांची दृष्टी तिक्षणता तपासणी न करण्याचे कारणे. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

विभाग नियंत्रक

## प्रपत्र-२

**चालकांची ४० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या निवृत्तीच्या वयापर्यंत दरवर्षी करावयाची दृष्टी तिक्षणता चाचणी.**

विभाग :

| विभागामध्ये ४० वर्षे पूर्ण असलेले एकूण चालक | दृष्टी तिक्षणता चाचणी प्रत्येक वर्षामध्ये केलेल्या चालकांची संख्या. | दृष्टी तिक्षणता चाचणी करण्याचे बाकी असलेल्या चालकांची संख्या | अनु.क्र.३ मधील चालकांची दृष्टी तिक्षणता तपासणी न करण्याचे कारण. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ३ | ५ |

विभाग नियंत्रक

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.२०/२०१४

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/समुपदेशक/ ५९८
म.रा.मा.प.महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांकः ०५ नोव्हेंबर, २०१४.

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर / गडचिरोली.

विषयः चालक पदातील कर्मचाऱ्यांचेसाठी समुपदेशक नेमणेबाबत.
संदर्भः १)कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१०/२०१२ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ समुपदेशक/२७५३ दिनांक २०.६.२०१२.
२)कर्मचारीवर्ग परिपत्रक क्र.६/२०१३ जावक क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ समुपदेशक/२७७३ दिनांक २४.६.२०१३

----------

रा.प.महामंडळातील कर्मचारी विशेषतः चालकांवर प्रवासी बस चालविताना सतत मानसीक ताण येत असल्याने त्याची परिणीती गंभीर प्रसंगामध्ये होऊ शकते. हे टाळण्याच्या उद्देशाने चालकांचे समुपदेशन करण्यासाठी ३-४ आगारांकरिता एक समुपदेशक याप्रमाणे मानद तत्वावर समुपदेशक नेमणूकीबाबत संदर्भित परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापी आवश्यकते प्रमाणे समुपदेशक उपलब्ध झाले नाहीत, व बरीच पदे अद्याप भरण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या योजनेचा मुळ उद्देश अद्याही पूर्णपणे साध्य झालेला नाही. त्यामुळे समुपदेशकांची उर्वरीत पदे तातडीने भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी तातडीने करावयाची आहे.

समुपदेशनाची प्रक्रिया अधिक परिणामकारक व्हावी याकरिता आणखी काही सुचना खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

१. शैक्षणिक अर्हता : मान्यताप्राप्त विद्यापिठाची / संस्थेची Medical and Psychiatric Social work या विषयासह Master of Social Work (M.S.W.) ही पदव्युत्तर पदवी.

२. अनुभव : समुपदेशन क्षेत्रातील शासकीय / निम शासकीय / मोठया खाजगी संस्थांमधील किमान तीन वर्षांचा अनुभव.

३. समुपदेशक पर्याप्त संख्येने उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने त्यांच्या सध्याच्या रु.३०००/- या मानधनात वाढ करुन ते रु.४०००/- इतके करण्यात येत आहे. दैनिक भत्ता व इतर सवलती पूर्वीच्या परिपत्रक क्र.१०/२०१२ दिनांक २० जून,२०१२ व ०६/२०१३ दिनांक २४ जून,२०१३ मध्ये नमुद केल्याप्रमाणेच राहतील.

४. समुपदेशकाने आगारांना दयावयाच्या भेटी : समुपदेशक आगारास महिन्यातून पूर्वीच्या किमान २ ऐवजी यापुढे किमान ३ वेळा भेटी देतील.

PDF Compressor Free Version



५. आगार समिती :- कोणत्या चालकांना समुपदेशनासाठी पाठवावयाचे याबाबत निर्णय घेण्यासाठी आगार पातळीवर समिती गठीत करण्यात आलेली आहे. तथापि सदर समितीने चालकांना समुपदेशनासाठी पाठविताना कोणत्या बाबी विचारात घ्यावयाच्या याबाबत मागील परिपत्रकात नमुद केले नव्हते. तरी या संदर्भात काही मार्गदर्शक बाबी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहेत.

अ) प्रवाशांशी वागताना सौजन्याचा अभाव. (तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.)
ब) व्यसनाधिनता.
क) गैरहजेरीचे प्रमाण जास्त.
ड) प्रापंचिक अडीअडचणींने मानसीक तणावाखाली वावर.
इ) लहान सहान गोष्टींमध्ये चिडखोरपणा, भांडखोरपणा व विध्वंसक प्रवृत्ती.
ई) व्यवस्थापनाच्या प्रत्येक निर्णयाकडे संशयाने पाहणे.
फ) वरील व्यतिरीक्त अन्य काही कारणे असल्यास तीही विचारात घ्यावीत.

६. संवाद व निरीक्षण : चालकांना दोन वेगवेगळ्या सत्रांमध्ये समुपदेशनासाठी पाठविल्यानंतर सदर चालकाची वागणूक,आचार-विचारामध्ये काही बदल झाला आहे का? याबाबतचे मोजमाप समितीने करावयाचे आहे. आवश्यक वाटल्यास वेळप्रसंगी संबंधित चालकाशी संवाद साधून त्याचे मत विचारात घेण्यात यावे. किंबहुना त्याने काही सूचना केल्या असतील तर त्याचाही बारकाईने विचार समितीने करणे आवश्यक आहे. तसेच अशा चालकांचे समुपदेशन झाल्यानंतर त्यांच्यामध्ये नेमका काय बदल झाला आहे याबाबत निदर्शनास आलेल्या बाबी स्वतंत्र नोंदवहीमध्ये नोंदवून ठेवण्यात याव्यात.

तरी आपणास निर्देश देण्यात येत आहेत की, समुपदेशकांच्या नेमणूकीची प्रक्रिया संदर्भित परिपत्रकान्वये वेळोवेळी विहीत केलेल्या व आता सुधारीत केलेल्या शर्ती व अटींनुसार त्वरीत सुरु करावी, व वृत्तपत्रामध्ये जाहिरात देण्यात यावी. तसेच समुपदेशकाच्या नेमणूकीची कार्यवाही दिनांक ३१.१२.२०१४ पर्यंत पूर्ण करावी. समुपदेशकांच्या नेमणूका व कार्यवाहीचा अहवाल विभाग नियंत्रक हे मुख्य कामगार अधिकारी यांना पाठवतील. मुख्य कामगार अधिकारी यांचे सदर योजनेवर संपुर्ण संनियंत्रण राहील. विभागीय स्तरावर समुपदेशकांची निवड व कार्यवाही याबाबत काही अडचणी असल्यास त्याचे निराकरण करण्याकरीता या कार्यालयाशी संपर्क साधावा. जर काही विभागांना जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज प्राप्त झाले नाहीत तर पुन्हा जाहिरात देऊन समुपदेशकांची मानद तत्वावर नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरु ठेवावी. कोणत्याही परिस्थितीमध्ये समुपदेशकाच्या नेमणूकीविना विभाग राहणार नाही याची दक्षता संबंधितांनी घ्यावी.

परिपत्रकाची पोच द्यावी.

उपाध्यक्ष व व्यवस्थाकीय संचालक

प्रत: मुख्य कामगार अधिकारी यांस माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २१/२०१४

क्र. राप/कर्मवर्ग/प्रशा/ ५२६९
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांकः १३ नोव्हेंबर, २०१४.

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय : वय वर्षे ४० पुढील चालकांची आरोग्य तपासणी करणेबाबत.
संदर्भः १) क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/युआर/५३२ दि.०६.०२.२०१२
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.०२/२०१४.
(क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/३२३ दि.१८ जानेवारी,२०१४)

------

आपले लक्ष संदर्भित परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. संदर्भित परिपत्रकान्वये महामंडळातील चालकाच्या दृष्टीतीक्ष्णता चाचणी बरोबरच इतर बाबीची वैद्यकीय तपासणी करून घ्यावी अशा सुचना देण्यात आल्या होत्या, त्यानुसार विभागांनी कार्यवाही केली आहे.

४० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या चालकांच्या बाबतीत वर नमुद केल्याप्रमाणे आरोग्य तपासणीचा कार्यक्रम पुन्हा राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पुन्हा एकदा खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

आगारातील सर्व चालकांची खाली नमुद केल्याप्रमाणे वैद्यकीय तपासणी करून घेण्यात यावी.

१) प्राथमिक वैद्यकीय तपासणी - रक्तदाब इ.मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांचे पातळीवर.
२) रक्त चाचणी --
अ) Blood Sugar
ब) C.B.C.
क) Liver Function Test (LFT)
ड) Kidney Test (Creatinine)
३) E.C.G.
४) छातीचा X- Ray - T.B. आजाराकरिता
५) मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांना आवश्यक वाटल्यास त्यांच्या शिफारसीनुसार अन्य वैद्यकीय तपासणी.

उपरोक्त चाचण्या / तपासण्या तालुका पातळीवर शासकीय रुग्णालय किंवा धर्मादाय रुग्णालय, शासकीय किंवा धर्मादाय पॅथॉलॉजीकल सेंटर, नामांकीत रजिस्टर्ड पॅथॉलॉजीकल सेंटर इ.मधून किंवा रोटरी क्लब, लायन्स क्लब किंवा अन्य सेवाभावी संस्था (N.G.O.) यांच्याशी संपर्क साधून त्यांचे मार्फत करुन घेण्यात याव्यात, जेणेकरुन कमीत कमी खर्च येईल. चालकांच्या आरोग्य तपासणीकरिता प्रती चालक प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा प्रती चालक कमाल रु.५००/- या दोहोंपैकी जे कमी असेल त्या मर्यादेपर्यंत खर्चाची प्रतिपूर्ती करुन देण्यात येईल.

चालकाच्या उपरोक्त चाचण्यांचे अहवाल मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांचेकडे आगार व्यवस्थापक यांचे मार्फत पाठविण्यात यावेत. सदर अहवाल आगारामध्ये प्राप्त झाल्यानंतर आगार व्यवस्थापक यांनी सदर अहवालाची एक प्रत कर्मचा-याला माहितीसाठी देण्यात यावी. सदर अहवालाच्या अनुषंगाने मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांनी काही उपचार किंवा अन्य चाचण्या सुचविल्या असल्यास त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

PDF Compressor Free Version



चालकांची वैद्यकीय तपासणी प्राधान्याने करण्याकरिता ४० वर्षांवरील चालकांची आगार निहाय त्यांच्या वयाप्रमाणे यादी तयार करण्यात यावी. सर्वात जास्त वय असणा-या चालकाचा प्रथम क्रमांकावर नाव घेऊन त्यानंतर उतरत्या क्रमाने यादी तयार करावी. त्यानुसार वैद्यकीय चाचणीसाठी पाठविण्याकरिता चालकांचे गट तयार करण्यात यावेत, व त्यांना क्रमाक्रमाने वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात यावे. वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्याकरिता चालकांची संख्या निश्चित करताना दैनंदिन वाहतूक व कामकाजावर परिणाम होणार नाही याच दक्षता घ्यावी.

घटक प्रमुखांनी कामगार अधिकारी यांचे मार्फत सदर प्रक्रियेचे संनियंत्रण करावे. तसेच प्रादेशिक व्यवस्थापकांनी त्यांच्या विभाग भेटीच्यावेळी सदर योजनेचा आढावा घ्यावा व अंमलबजावणीत काही अडचणी असल्यास त्या दूर कराव्यात. प्रत्येक महिन्याच्या अखेरीस प्रत्येक घटक प्रमुखांनी खालील नमुन्यात मुख्य कामगार अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई यांचेकडे चालकांच्या वैद्यकीय तपासणी संदर्भात अहवाल पाठवावा.

विभागाचे नांव :
महिना :

| विभागातील एकुण कार्यरत चालकांची संख्या | रकाना १ मधील ४० वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या चालकांची संख्या | रकाना २ मधील महिना अखेरपर्यंत वैद्यकीय तपासणीस पाठविलेल्या ४० वर्षांवरील चालकांची संख्या | वैद्यकीय तपासणीमध्ये दोष न आढळलेल्या चालकांची संख्या | वैद्यकीय तपासणीत दोष आढळलेल्या चालकांची संख्या | वैद्यकीय तपासणीमध्ये आढळलेल्या दोषाच्या अनुषंगाने काय पुढील कार्यवाही करण्यात आली इ.ची माहिती. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

वरील सुचनांची अंमलबजावणी त्वरीत सुरु करावी. परिपत्रकाची पोच द्यावी.

(सही)
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नियोजन)/ उपमहाव्यवस्थापक (संगणित्र)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिक / जनसंपर्क अधिकारी / कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (घटक संवर्ग) / (प्रशासन) / सामान्यप्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) / (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)

(सही)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

PDF Compressor Free Version

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २२/२०१४

क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/युआर/ ५९१८
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८,
दिनांक : १८.१२.२०१४.

- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई/ पुणे /औरंगाबाद/नागपूर/ नाशिक/ अमरावती.
- विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)

विषय सरळसेवा भरती सन २०१२ - वाहक (कनिष्ठ) पदाबाबत.
वाहक परवाना वैधतेबाबत.
संदर्भ या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/२१६७
दिनांक २३.५.२०१३

...

सरळसेवा भरती सन २०१२ अंतर्गत वाहक (कनिष्ठ) पदी निवड झालेल्या उमेदवारांना वाहक परवाना कागदपत्र पडताळणीच्या दिवशी अवैध असल्याने संबंधीत विभागामार्फत कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरविण्यात आले होते. या संदर्भात एका विभागातील उमेदवाराने दाखल केलेल्या एका याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामध्ये वाहक परवाना जाहिरातीच्या दिनांकापर्यंत वैध असल्यामुळे सदर उमेदवार नेमणूकीसाठी पात्र ठरत असल्याचे नमुद केले आहे.त्यानुसार सर्व विभागांच्या उचित कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे सुचना प्रसारित करण्यात येत आहेत.

सरळसेवा भरती सन २०१२ अंतर्गत वाहक (कनिष्ठ) पदामध्ये जाहिरातीच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक ०७.०८.२०१२ पर्यंत तसेच जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत म्हणजेच दिनांक ०५.०९.२०१२ पर्यंत वैध असलेला परवान्याची मुदत कागदपत्र पडताळणीच्या वेळी संपली असल्यास व सदर उमेदवाराने वाहक परवान्याची मुदत / वैधता त्यानंतर वाढवून घेतली असल्यास सदर उमेदवाराने दिलेला वाहक परवाना ग्राह्य समजण्यात यावा.याबाबत मा.उच्च न्यायालय,खंडपिठ औरंगाबाद यांनी याचिका क्रमांक ८२९९/२०१३ च्या अनुषंगाने दिलेल्या निर्णयाची प्रत आपल्या माहितीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

तरी उपरोक्त सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा तपशील या कार्यालयास कळविण्यात यावा.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

सोबत : वरील प्रमाणे
मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत

G:\Circular Letter 2014.docx

PDF Compressor Free Version



IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
BENCH AT AURANGABAD

WRIT PETITION NO. 8299 OF 2013

Kailas Bhausing Jagarwal ...Petitioner

versus

The State of Maharashtra and others ...Respondents

.....

Mr. S.B. Solunke h/f Mr. S. S. Thombre, advocate for the petitioner
Mrs. M.A. Deshpande, A.G.P. for respondent No.1
Mrs. R.D. Reddy, advocate for respondent Nos. 2 and 3.

.....

**CORAM : S. S. SHINDE AND V. K. JADHAV, JJ.**

**Date of Reserving the order : 17.04.2014**

**Date of pronouncing the order : 23.04.2014**

**ORDER (PER JADHAV, J.) :-**

1. Rule. Rule made returnable forthwith. By consent, heard finally.

2. Being aggrieved for non consideration of candidature of the petitioner, for the post of conductor, on the ground of non fulfilling stipulated condition of having Conductor's licence, on the date of verification of documents, the petitioner has approached this court by filing present writ petition.

::: Downloaded on - 08/12/2014 13:27:20 :::

PDF Compressor Free Version



3. The facts, giving rise to the present petition, are as follows:-

Pursuant to the advertisement published by respondent No.2 on 7.8.2012, the petitioner has applied for the post of Conductor. The petitioner has submitted on line application with MKCL, which has conducted on line registration and written examination. As the petitioner found eligible, he was allowed to give written examination and he had passed the said written examination successfully. He is selected and placed in the selection list at Sr. No.11. Thereafter, respondent No.3 has issued a letter dated 2.5.2012, thereby directing the petitioner to remain present on 13.5.2013 for verification of documents. On that date, respondent No.3 has pointed out that Conductor's licence of the petitioner was not valid. Thus, the claim of the petitioner came to be rejected on the ground of not having valid licence of Conductor. According to the petitioner, he has renewed his licence for the period from 18.5.2013 to 17.5.2016. The petitioner accordingly prayed for direction to respondent Nos. 2 and 3 to issue appointment order in favour of the petitioner as per select list.

4. In the affidavit in reply, filed on behalf of respondent Nos. 2 and 3, it has contended that during the process of verification of documents, it was found that the petitioner was not having valid licence of conductor and its period was expired. On 13.5.2013, it was

::: Downloaded on - 08/12/2014 13:27:20 :::

PDF Compressor Free Version



found that licence was valid till 17.2.2013 only. Thus, the respondents disqualified the petitioner at the time of scrutiny/verification of the documents and therefore, the respondents prayed for rejection of this writ petition.

5. We have heard learned counsel appearing for petitioner and learned counsel for the respective respondents. With the able assistance of respective learned counsel, we have perused the pleadings in the petition and the affidavit in reply filed on behalf of respondent Nos. 2 and 3.

6. On careful perusal of advertisement Exh. "A" page 12 of compilation, we find that the eligibility criteria is prescribed as on 7.8.2012 pertaining to educational qualification, which includes the Conductor's licence and Batch, apart from other eligibility, which need not be discussed here. The petitioner has produced copy of conductor's licence at Exh."B". On perusal of the same, it appears that Conductor's licence was valid from 18.2.2010 to 17.2.2013. Thus as on that date, as prescribed in the advertisement, the petitioner was having valid conductor's licence as prescribed by the respondents. Even as per condition No.19, communication dated 2.5.2013 at Exh. C for verification of documents, the documents as specified in the advertisement shall not be considered after due date i.e. 7.8.2012 as

::: Downloaded on - 08/12/2014 13:27:20 :::

PDF Compressor Free Version



stated in the advertisement. The petitioner has now renewed his Conductor's licence on 18.5.2013 and the same is valid upto 17.5.2016. In our considered opinion, the petitioner has fulfilled the eligibility criteria as on 7.8.2012. In view of this, petition deserves to be allowed. Hence, following order:-

ORDER

I) The writ petition is hereby allowed in terms of prayer clause "B".

II) Rule made absolute in the above terms.

(V. K. JADHAV, J.) ( S. S. SHINDE, J. )

rlj/

::: Downloaded on - 08/12/2014 13:27:20 :::

PDF Compressor Free Version

परिपत्रक

क्रमांकः रापं/आस्था/४०८-ई(१)/ ५८८८
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ४०० ००८.
दिनांक : १० डिसेंबर, २०१४.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई /पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
- मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/उस्मानाबाद/परभणी/नागपूर भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

**विषय : माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार व्यापक जनहिताशी संबंध नसलेली वैयक्तिक स्वरूपाची माहिती न पुरविण्याबाबत.**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ मधील कोणती माहिती पुरविण्याचे आबंधन माहिती अधिका-यावर असणार नाही या उपरोक्त विषयाबाबत कार्यवाही संदर्भात मा.श्री.प्र.प्र.गोसावी, शासनाचे उपसचिव यांनी सूचना प्रसारित केलेल्या आहेत. त्यासंबधी सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण२०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा, दि.१७.१०.२०१४ ची प्रत उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. घटक प्रमुखांनी सदरच्या सूचना जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी व इतर अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्याव्यात व तशी नोंद दप्तरी ठेवण्यात यावी.

सोबत : वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :-</u>**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक ( भां. व ख.) /महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (यं. अ)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ/जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक अधिकारी / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव /अध्यक्षांचे स्वीय सचिव / सह व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सहाय्यक / मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन)/ (मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(मुख्यालय)/(घटकसंवर्ग)/(मावक)/(राज्यसंवर्ग)

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

D:\SAU\Mahiticha Adhikar\Circular